विजय खाडिलकर

# वास्तुपुरूष



# वास्तुपुरूष

(दोन अंकी नाटक)

विजय खाडिलकर

(सर्व हक्क लेखकास्वाधीन)

ई साहित्य प्रतिष्ठान

**वास्तुपुरूष**

(दोन अंकी नाटक)

लेखक श्री. विजय खाडिलकर

vijay.s.khadilkar@gmail.com

१४०३, माझगांव टॉवर्स, म्हातारपाखाडी , माझगांव, मुंबई..१०

दूरभाषः ०२२ - २३७७६८८९ , चलतध्वनिः ९८२१२२२०४२

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : १० जानेवारी २०१६

©esahity Pratishthan®2016

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# श्री विजय खाडिलकर



कलावंताला त्याच्या कलेहून अधिक वेगळ्या ओळखीची गरजच नसते असे म्हणतात. ई साहित्य प्रतिष्ठानचे वाचक विजय खाडिलकर यांना “खिडक्या” व “धर्म” या कथासंग्रहांचे लेखक म्हणून ओळखतात. त्यांच्या दोन्ही ई पुस्तकांना वाचकांची पसंतीची दाद मिळाली. त्यामुळे हे तिसरे पुस्तक. दोन कथासंग्रहांनंतर एक नाटक.

श्री विजय खाडिलकर यांच्या कथा वाचल्यावर हे जाणवते की या लेखकाने आपले लेखन आयुष्यभर जोपासले असते तर मराठीला एक विशेष लेखक मिळाला असता. पण फ़ार विषादाची गरज नाही. बहुराष्ट्रीय कंपनीतून निवृत्तीनंतर त्यांनी आपली लेखनकला जोपासली आणि अनेक कथा, कविता, कथासंग्रह व नाटक असा खजिना वाचकांसाठी उपलब्ध करून दिला. हे पुस्तक म्हणजे त्यांच्या संपूर्ण खजिन्याची एक झलक म्हणता येईल. त्यांचा आजवरचा साहित्य प्रवास खाली देत आहोत.

खिडक्या, मायबोली प्रकाशन

लालबत्ती, अक्षर प्रकाशन

सरसरती सर. अक्षरमानव

परिक्रमा: शब्दांजली प्रकाशन    हे कथासंग्रह व

वसंतचाहूल: अक्षरमानव  हा कवितासंग्रह

पारंब्या:  अनघा प्रकाशन ..ही कोमसाप स्पर्धेत तृतिय पारितोषिक पात्र कादंबरी..
या शिवाय दिवाळी अंकातून कथा व कविता येत असतात..

श्री विजय खाडिलकर हे जी ए कुलकर्णी यांचे चाहते. त्यामुळे त्यांच्या

कथांतून जी एंची झलक दिसते त्याचबरोबर त्याहून वेगळं लिहिण्याची उबळही जाणवते. मानवी नातेसंबंधांतली असहाय्यता आणि सौंदर्य यांचा वेध हे जीएंच्या कथांचं एक महत्त्वाचं वैशिष्ट्य. ते खाडिलकरांच्या कथेतूनही ठळकपणे प्रत्ययाला येतं. कथेला नाट्यापेक्षा काव्यगत सार्वत्रिकता हेही जिएंचं वैशिष्ट्य खाडिलकरांच्या कथेतून जाणवतं.

त्यांच्याचप्रमाणे पात्रांच्यामागची सामाजिक धार्मिक पार्श्वभूमी ठळक करताना काळ आणि परिसर यांत मात्र खाडिलकरांनी स्वतःचा वेगळा प्रांत चोखाळला आहे. विजय खाडिलकरांच्या कथांतून प्रत्ययाला येणारा धर्म हा surrealistic आहे. तो आहेही आणि नाहीही. वास्तव आहे. पण भिंती आणि भितीच्या पलिकडे जाऊन दोन काठांना जोडणारा पूल आणि भिन्न प्रकृतींना जवळ आणणारा pull असे त्याचे स्वरूप जाणवते. सहृदयी वाचकांना भुरळ पडेल असे विजय खाडिलकरांचे कथानक आणि वाचताना रममाण व्हायला लावणारी त्यांची शैली यांचं गारूड वाचकावर खुप काळपर्यंत रहातं.

वास्तुपुरूष हे सामाजिक स्थित्यंतरांतून जाणाऱ्या पण काळाबरोबर न बदललेल्या वृत्तीचं एक नाट्यमय रुपांतर म्हणता येईल. जुन्या काळातल्या कुटुंबातल्या स्त्रियांची घुसमट जशी या नाटकातून सामोरी येते त्याचबरोबर नवीन काळातील वाहत्या पाण्यात हात धुवून घेण्याची संधीसाधू, मूल्यहीन वृत्तीही दिसते. विजय खाडिलकरांच्या लेखनाचं वैशिष्ट्य हे की ते त्यातील कोणाची बाजू बिजू न घेता जे आहे ते समोर ठेवतात आणि वाचकाच्या संवेदनशीलतेवर आणि मूल्यरचनेवर भाष्य करण्याची जबाबदारी सोडून देतात. पण त्यांचं नाटक आणि त्यांच्या कथा मनाला भिडतात आणि खोलवर ठसा उमटवून जातात हे मात्र नक्की.

विजय खाडिलकरांचं हे नाटक तुम्हाला कसं वाटलं ते जाणून घ्यायला आवडेल. तुमचा विस्तृत अभिप्राय आल्यास आम्ही ऋणी राहू. ई साहित्य प्रतिष्ठान हे साहित्यावरच्या चर्चेचं व्यासपीठ व्हावं ही मुख्य प्रेरणा आहे. ते तुमच्या अभिप्रायांतूनच साध्य होऊ शकेल.

धन्यवाद
टीम ई साहित्य

# प्रास्ताविक :

नाटक हा साहित्यप्रकारातला द्रुष्य आविष्कार, जो बराचसा सादरीकरणावर आधारित असतो..त्यात पात्रं, त्यांचा अभिनय आणि संवाद हे सारं अंतर्भूत असावं असा संकेत आहे.त्यातच वातावरण निर्मितीसाठी प्रकाशयोजना; संगीत व नेपथ्याचाही सहभाग असतोच.पण ह्या सा-याच्या मुळाशी चांगली संहिता असायला हवी ; आणि कथावस्तू प्रेक्षकांना गुंतवून ठेवण्याएवढी सशक्त असली तरी संहितालेखन, वाटतं तेवढं सहजसोपं नाहीच. नेपथ्यरचना ही जरी दिगदर्शकीय कल्पनाशक्तिवर अवलंबून असली तरी कथानक उलगडण्याचं कौशल्य नाटककाराच्या निरिक्षणशक्तिनुसार कमीअधिक असू शकतं..ह्या सा-याचा विचार करून माझ्या 'यात्रा ' ह्या पूर्वप्रकाशित कथेवर आधारित ही नाट्यरचना सादर करत आहे..प्रथम प्रयत्न असल्यामुळे नाट्यक्षेत्राशी संबंधित एका जाणकार मित्राच्या सूचनेनुसार त्यातल्या त्रुटी दूर करून थोडीफ़ार भर घातली. तरी मूळ कथेचा आवाका तसा आटोपशीरच होता.

अक्षरमानव आयोजित २०१४च्या संहितालेखन स्पर्धेत परिक्षकांनी लक्षणीय ठरवलेली ही संहिता ई-साहित्यच्या माध्यमातून वाचकांहाती सोपवत आहे.ती

प्रत्यक्ष मंचावर नाही तरी वाचकांना मंचीय अनुभूति देईल असा विश्वास वाटतो.

प्रतिसाद कळेलच..तोवर फ़क्त प्रतिक्षा, वाचकांच्या अनुकूल प्रतिक्रियांची !!

लेखक

एकाकी आयुष्य जगणा-यांचे वाया जाणारे

प्रतिक्षेचे क्षण पूर्णविराम येण्याआधीच

परिपूर्ण करणा-यांच्या संवेदनेला सलाम !

# वास्तुपुरूष

# वास्तुपुरूष

स्थळः कल्याणातला डेव्हलपरची नजर पडलेला दूरवरचा वाडा.

काळः सुमारे २००० च्या आसपासचा..

नेपथ्यः

समोर डाव्या कोप-यात कधीकाळी असलेली दिंडी, आता दरवाजे नसल्यामुळे फक्त उघडं गेट.समोर रिक्षा असल्याचा भास.गेटाला लागून; वर जुनाट कमानींची माडी असलेली व खाली दोन खोल्यांची दारं दिसणारी एका पायरीच्या उंचीवर ओटा असलेली आडवी चाळवजा इमारत.उजव्या बाजूला उतरत्या छपराची थोडी तिरपी दिसणारी एका पायरीच्या उंचीवर असलेली अर्ध्या कठड्याची उघडी ओटी.चाळ आणि ओटीच्या मधे मागच्या पायखान्याकडे जाण्याची वाट.ओटीखालच्या मागच्या बाजूला नळाखाली वहात असलेली (फक्त आवाज )एक न दिसणारी बादली.

डाव्या विंगेजवळ विहिरीचा कठडा, त्यामागे झाडाचा अर्धवट दिसणारा पार. दोन्हीच्या मधे कल्पनेतली पूर्वी घोडा बांधायची पण आता लाकूड फाटा ठेवण्याची पत्र्याची शेड.उघड्या ओटीच्या नळाच्या बाजूच्या कठड्याजवळ पितळी स्टॅन्डचा दिवा असलेलं बसून लिहायचं डेस्क, मागे टेकायचा तक्कया व भिंतीवर सरस्वतीची तसबीर. जरा बाजूला बसायचा बाक व त्यावर एका बाजूला लोकमान्यांची तसबीर व जरा अलिकडे आत जाण्याच्या दरवाजाला लागून दोन्हीकडे दोन खुंटया, एकीवर झांजा व दुसरीवर; आता हयात नसलेल्या किर्तनकार पुराणिक बुवांची लाल पगडी.

दरवाजावर जुन्या पद्धतिचं काचमण्यांचं त्रिकोनी तोरण.दरवाजाच्या डाव्या बाजूलाफळीवर रेडिओचं जुनं मॉडेल..

पात्रपरिचयः

**वास्तुपुरूष** ः हाच सूत्रधार आणि शेवटच्या दृष्यात आता हयात नसलेले कीर्तनकार ह.भ.प.धुंडिराजबुवा पुराणिक.

**राधाक्का** ः आता वय झालेली कपाळी चिरी; काळी पोत, बुगडया नि नऊवारी लुगडयातली सदा ओचेपदर खोचलेली बुवांची सून.

**बाबूः (उर्फ उद्धव** )राधाक्काचा पस्तीशीचा रिक्षाचालक मुलगा.उशिरा झालेला. डोळयात लहानपणी सारा आल्यामुळे गॉगलचा चष्मा लावणारा नि सतत मावा खाणारा विवाहित मुलगा. बायको बेळगांवला माहेरी निघून गेलेली.

**दत्तूः (उर्फ देवदत्त** )राधाक्काचा थोरला मुलगा; बाबूपेक्षा सतरा वर्षांनी मोठा.बुवा असतांनाच हॉस्टेलात गेलेला.पुढे धुळयाला कॉलेजात प्राध्यापक होऊन तिकडेच स्थिरावलेला.क्वचितच घरी येणारा.

**संभूस मामी व त्यांचा रिक्षाचालक लग्नाचा मुलगा भास्कर** .समोर माडीखालच्या चाळीतल्या गेटाजवळच्याच खोलीत बि-हाड करून रहाणारे.

**तात्या जेरे**ः कुटुंब सोलापुरात ठेवून खासगी हायस्कूलातल्या नोकरीसाठी खानावळीत जेवून बाजूच्याच खोलीत एकटा रहाणारा शाळामास्तर.

**प्रभा..**मास्तरांची मुलगी मुंबईत दाखवायला आणलेली.

**शेवटी येणारा दाढी वाढलेला** ः बाबूचा बाप विश्र्वनाथ पुराणिक,

आणि इतर...

# वास्तुपुरूष

(अंक पहिला)

उघडया गेटातनं हळूहळू मंद प्रकाश पसरत येतो.पार्श्वभागी फक्त संवादः

राधाक्काचा आवाजः अग अग मेले..हळू जरा..धडकलीस कि एकदम येऊन.

चिन्नाचा अनोळखी आवाजः  ए बाय आपून नाय तुजा पायखाना साफ करनार..

राधाक्काः का? माज आलाय का तुला ? का दुसरा नवरा भेटला ?

चिन्नाः तुजा बाबू, मी काम कराय लागलो का रोज उगडा होऊन समोर उबा
-हातो.तुज्या भाडुताला इचार पायजेल तर.असल्या वंगाळ कामासाटनं नाय नवरा
सोडला.मी काय तेला बाजारमधली बाटली काय ?

राधाक्काः थांब दे तो झाडू..बघतेच मी मुडद्याला.मावा खायला उभा असेल ना.

(रिक्षा सुरू झाल्याचा आवाज..)

राधाक्काः मुडद्या..दात दाखवत पळशील कुठे ? गिळायला येशीलच ना !

मंचावरः

वास्तुपुरूषः पगडी बाराबंदीवाला कीर्तनकाराच्या वेषातला सूत्रधार.उजव्या विंगेतून प्रवेशतो.मध्यभागी प्रकाशझोतात.ह्याचा वावर बखळीकडे जाणा-या उजव्या विंगेतून.

वास्तुपुरूषः झाला दिवस सुरू ह्या घराचा.रोज असलंच कायतरी ऐकावं लागतंय; मलाच नव्हे..सगळयांनाच..संवय झालीय. मी तर आत्मा आहे ह्या घराचा.. वास्तुपुरूष.ही वास्तू आहे तोवर मी आहेच.ह्या घराच्या मालकिणीने, राधेने अजून धरून ठेवलंय.मलाच नव्हे सगळया भोवतालाला.केवळ नवरा परत आला तर त्याला घर सापडावं म्हणून ह्या वास्तूला जपतेय.दोन तपं व्हायला आली.तिला विश्वास आहे; यात्रेच्या निमित्ताने परागंदा झालेला तिचा नवरा, ह्या वास्तूचा मालक विश्वनाथ परत येईल.म्हणून अहेवपण मिरवतेय अजून. वारस तर काय वाटच

बघताहेत.एक विद्वान प्राध्यापक तर दुसरा अडाणी रिक्षावाला.ह्यांना नात्यांशी कांही देणंघेणं नाही.त्यांना हवाय फक्त पैसा..तोही बिनकष्टाचा.
राधेची ही एकाकी झुंज..पाहूया किती दिवस चालतेय्. ..

उजव्या विंगेत जातो.
क्षणभर अंधार आणि पुन्हा गेटातूनच हळूहळू येणारा सकाळचा प्रकाश.. राधाक्का उजव्या हातात दुधाचा पितळी तांब्या हलवत नि शरिराला दोन्ही बाजूने हेलकावे देत व तोंडाने बडबडत गेटातनं आत शिरते.तोच पहिल्या बि-हाडातून संभूस मामी दाराशी येत विचारते.

संभूस मामी : काय झालं उद्धवच्या आई ? आमच्या खिडकीखाली गडबड कसली ?

राधाक्का : व्हायचंय काय ? ती चिन्ना झाडूवाली धडकली येऊन अंगावर..काम तसंच टाकून गेली.आता पायखाना कोण साफ करणार ..

संभूसः हो का ? तिला बघितलं मी खराटा नाचवत होती तुमच्यासमोर ते.पण तुम्ही तो काढून का घेतलात मग ?.

राधाक्काः कर्म माझं.ह्या बाब्याला बडवणार होते.

संभूसः ..बाऽऽऽ ई.. एवढया मोठया मुलाला ? तेही रस्त्यावर ? बाई ग..अहो पण केलं काय त्यानी एवढं ?

राधाक्काः काय नाही.मेला झाडूवालीसमोर चाळे करतोय.आता गेला असेल रिक्षा घेऊन.

संभूसः बघितला मी.आत्ता मास्तरांच्या खिडकीखाली उभा होता टपरीवर.

राधाक्काः तो मावा खायला.दुसरं काय ! आधी बुवा असतांनाच त्यांच्या पानाच्या डब्यातला तंबाखू खायची संवय लागली होती नि आता मावा. तो नाही खाल्ला तर त्याचे पितर खाली येतील ना.

राधाक्का आपल्या ओटीवर दुधाचा तांब्या ठेवून फेरी मारून ओटीपलिकडच्या बोळाच्या तोंडाशी जाते.. वहात्या पाण्याचा आवाज थांबतो.पायावर पाणी घेतल्यासारखं करून स्वतःशीच बडबडत पायरीपाशी येते.

राधाक्काः अहो मास्तर.बादली वहात ठेवून कुठे जाता ? आता विहीरीवरचा पंप बंद झालाय ! हे म्युन्शिपाल्टीचं पाणी. पैसे पडतात त्याला.

मास्तरः (आपल्या खोलीतूनच ओरडून सांगतात.)..आलो आलो..

संभूसः पण उद्धवच्या आई.चिन्नाचा खराटा कशाला काढून घेतलात मग ?

राधाक्काः (पायरीवर बसताबसता ) मामी; तुम्ही काय सदानकदा त्या खिडकीशीच बसून असता कि काय दिवसभर..ते बाब्या काय म्हणतो ते वॉच का काय ते ठेवायला ?

संभूसः घ्या आता. ज्याचं करावं भलंऽऽऽ... जाऊंदे..अहो तुमचा आवाज ऐकला म्हणून डोकावले.एवढया सकाळी कुठे गेलावतात ते बघायला..

राधाक्का.ः ते मी रोजच जाते समोरच्या बोळापलिकडे; दूधअड्डयावर.तिथे पिंपळपारावर दूधवाले थांबतात घटकाभर स्टेशनला जाण्याआधी.स्वस्त मिळतं मग.एवढया वर्षांचा शिरस्ता आहे माझा.

संभूस ः पावशेर दुधासाठी एवढा जड तांब्या घेऊन जाता. दमणूक नाही होत ?

राधाक्काः सांगणार कोणाला ? बाब्या कांही जायचा नाही..सासूच्या जमान्यात बरी दारात गाय होती.

संभूस ः कुठे ? इथे ?

राधाक्काः (ट्रान्समधे गेल्यासारखी जरा थांबून )होय हो.होय. सासूच्या माघारी मग माझ्याने काय झालं नसतं.ती तानीही म्हातारी झालेली.त्यात मी गरोदर.तेही सतरा वर्षांनी.बुवांनी देऊन टाकली गाय. तिथेच मग घोडमं आलं, टांग्याचं. बाब्याच्या नशीबात घरचं दूध नव्हतंच म्हणायचं.

संभूसः तेव्हांपास्नं दूधअड्डयावर जाताय ?

राधाक्काः अगदी लगेच नाही.बुवांना आवडत नसे ना.आमचा खंडोबा जायचा मग.

संभूसः टांग्याचा कोण तो तुम्ही म्हणता तो मोतद्दार ?

राधाक्का: छे हो.अहो नवरा माझा.बाब्याचा बाप. असाही माझ्यावर लक्ष ठेवल्यागत असायचा. वाडयातली माणसं बघतील म्हणून.संशयी मेला.बाळंतपणात अंगाने चांगली भरले होते ना.

संभूस: बाई ग ऽऽऽ. मग ?

राधाक्का: मग काय ? गेला निघून एक दिवस ! यात्रेला जायचं निमित्त करून गेला तो आलाच नाही.बुवा थकले वाट बघून.तेच मग बघायचे बाब्याला. तेव्हांपास्नं बाहेर जायला लागले. कधीकाळी भाजीच्या गाडया दारात थांबायच्या बैलांना पाणी पाजायला ते मग मलाच जायला लागलं पिंपळपारापोतर दूध भाजीसाठी.बाब्या छान बुवांच्या टांग्यातनं फिरून यायचा, राममंदिरापर्यंत.कालाय तस्मै नम : .चला.चहा व्हायचाय अजून..तुम्हीपण ना मामी..(हाताचा रेटा देत उठते )

संभूस: आधीच उशीर केलायत बाबूवर ओरडण्यात.त्यात आणि ती चिन्ना आली खेटायला ?

राधाक्का : कर्म माझं. ती गेली आता काम सोडून.तिचाच खराटा घेऊन बडवणार होते बाब्याला.तर पळाला रिक्षा घेऊन.मुडद्याने मागच्या बखळीत तिची काय छेड काढली कोण जाणे.बायको गेली माहेरी निघून नि हा चाललाय झाडूवालीच्या मागे मागे ..

संभूस: हे काय भलतंच उद्धवच्या आई ? अहो बाजूच्या नव्या सोसायटयांमधली लोकं बघायला लागली असती ना.

राधाक्का: एक खिडकीसुद्धा उघडली नाही.त्याना काय फरक पडतोय.त्यांचंच कशाला? तुमचा भास्कर नाही गेला त्याची रिक्षा घेऊन हंसत हंसत.कुठे थांबला ? सगळयांना सगळं माहित असतं हो. आणि ती ब्लॉकातली माणसं उठतायत कुठे एवढया सकाळी ?

..एवढयात दुसरा दरवाजा उघडून पन्नाशीचा उघडया अंगाचा नि पट्टयांचा लेंगा घातलेला जेरेमास्तर मागच्या बखळीतल्या न्हाणीघरात अंघोळीसाठी जायला येतो. तोंडात टूथब्रश नि खांद्यावर टॉवेल. ..

राधाक्का: मास्तर; नळ सुटा ठेवून कुठे जाता ?

मास्तर: (तोंडात ब्रश धरून बोबडया स्वरात) तुम्ही आधी बाबूरावांना सांगून तो गळका नळ बदलून घ्या.

संभूसः हे बरिक खरंय बाबूच्या आई.अहो पाण्याला प्रेशर नाही नि बाहेर वहात असला कि घरात पाणी बारिक येतं मग.पुरूषांचं बरंय.जातात मागच्या बाथरूमात. बायामाणसांनी काय करावं ? मोरीत साठवणीचं पाणी वापरावं लागतं मग.

राधाक्काः तुमचंही झालं का सुरू ? मास्तर आता आधी ओतून द्या ती बादली. मी शिवलेय ना.म्हंजे पाय धुवायला घेतलं पाणी. अंघोळीला कशी चालेल ?

मास्तरः (लक्षात न येवून विचारतो) त्याला काय झालं ?

राधाक्काः अहो ऽऽऽ आता तुम्हाला पण सगळं सांगत बसू का ? ती चिन्ना येऊन खेटली ना मला.आता अंग धुतल्याशिवाय कुठला चहा नि काय..

मास्तरः तुम्ही पण ना राधाक्का.तुमचे चिरंजीव, बाबूराव गेले का रिक्षा घेऊन ?

राधाक्काः त्याचंच तर रामायण चाललंय.आत्ताच गेला मुडदा मावा खाऊन.तुम्ही आधी त्या खिडकीखालच्या टपरीवाल्या पोराला हाकला बरं.मावा नि सिगरेटी विकतोय मेला.

संभूसः ते कशाला हाकलतील ? त्यांची रात्रीच्या पानाची सोय होतेय आयती.हात लांब करून.

मास्तरः (वेडावल्यागत करीत )तुमचा भास्करपण असतो ना ? रात्री पावभाजीच्या गाडया लागतात तेव्हां.

.. संभूसमामीकडे बघत मास्तर उजवीकडे मधल्या बोळातून मागे जातो...
राधाक्काः चला; अंगधुणं झाल्यावर चूल तर पेटवायलाच हवी.(संभूसमामींकडे बघत.) आधी गार पाण्याचे चार तांबे ओतते बोडक्यावर.तोवर कांही चहाचा घोट नाही; त्या मेल्या चिन्नापायी.

संभूस.ः मी आणू का उलीसा ? माझा झालाय.भास्कर गेला ना घेऊन.मघाशीच म्हणणार होते.पण तुमचं ते चिन्नापुराण...

राधाक्काः आणा अर्धा कप.बसते इथेच अंमळ. (पायरीवर पाय ठेवून पुन्हा खांबाजवळ बसते.) थकायला होतं आताशे.तुम्ही सुद्धा किती करता! आता सून आणा लवकर..

संभूसः  मुली यायला हव्यात ना सांगून.शिक्षण बेताचं.त्यामुळे नोकरी नाही नि रिक्षावाल्याला कोण देणार मुलगी.

राधाक्काः न द्यायला काय झालं. आमच्या उद्धवाचं नाही का झालं लग्न.

संभूसः पण नाकं मोडत गेलीच ना परत बेळगांवला ?

राधाक्काः माहितीतली नव्हती ना.तुम्ही नीट माहितीतली बघा.नाहीतर मास्तरांना विचारा त्यांची विभा कि प्रभा;  कोण ती गेल्या साली म्याट्रिक झाल्ये ना.

संभूसः कायतरीच काय.ते तिला शिकवताहेत पुढे.आणि नोकरी कुठाय तिला? रिक्षावर का घर चालणारे ? तुम्हाला बरं भाडयाचं तरी उत्पन्न आहे.

राधाक्काः त्याने काय होतंय ? आणि असे काय हजाराने मिळताहेत. बाब्या रिक्षाचे पैसे बाहेरच उडवतोय.

संभूसः पण थोरला देवदत्त एवढा प्रोफेसर आहे.तो पाठवत असेल ना केव्हांतरी.

राधाक्का : कधी बघितलायत का पोष्टमन आलेला ? दत्तू गेला तिकडचाच झाला. घरजावई झालाय जणू. बुवांना अजिबात आवडलं नव्हतं ते.आता लेकिचं लग्न काढील.त्याचं तसं नि इकडे बाब्याचा बाप बसलाय जाऊन यात्रेला. कुठे हिमालयात जाऊन बसलाय बावीस वर्ष तोच जाणे.मेला पळपुटा ! नि ऐदीसुद्धा.बुवा असतांना कधी शेतावरचं धान्य आणायला जमलं नाही. बुवांनी सोय केली नसती तर मी बाईमाणूस काय करणार होते?

..संभुसमामी आत जाऊन चहा आणते..

राधाक्काः (घोट घेत..) तुमच्यामुळे चहा तोंडात पडला.नाहीतर कधी अंग धुणार होते नि कधी चूल पेटवून चहा करणार होते.पण तुमचा भास्कर का हो गेला एवढया लवकर?

संभूसः अहो.आत्ता मुंबईकडे भाजी घेऊन जाणा-या सवा-या भेटतात स्टेशनापोतर.

राधाक्काः कित्ती मेहनत करतोय.नाहीतर आमचा बाब्या.ऐदी झालाय बापासारखाच आता गिळायला येईल फुकटया. चला. .. आधी चार तांबे अंगावर घेऊन चूल

पेटवायला हवी. ..(कप मामींच्या हाती देत.).मामी तो कप पाणी घालून घ्या. शिवाशिव झालीय !

.. पायरीमागच्या खांबाला धरून रामा रामा म्हणत उठते..नि डाव्या विंगेत विहीरीच्या मागे शिरते. ..

संभूसः अहो.तिकडे कुठे चाललात आता ?

राधाक्काः (वळून बघत.) चुलीला काय माझी हाडं लावू ? लाकडं नकोत? टांगा नि घोडं गेल्यापास्नं इथे बरी सोय झालीय सरपण ठेवायला. (आतून दोन लाकडं घेऊन येते).

संभूसः गावात गॅस आलेत सगळयांकडे नि तुम्ही अजून चूल फुंकताय ?

राधाक्काः काय करू मग? कार्डावरचं घासलेट हा बाब्या आणील तेव्हां. वर म्हणतोय तुला गॅस पेटवायला नाय जमायचं.

संभूसः त्यात जमायचं काय ? सोपं नाही का पडणार ?

राधाक्काः बायको असती तर आणलान असतान.टयूबा नाही लावून घेतल्यान अवघ्या वर्षभरात. त्याही जातच असतात मधनंच.मी मात्र वर्षानवर्ष तो बुवांच्या डेस्कावरचा स्टॅन्ड नि आत घासलेटच्या चिमणीच्या उजेडात स्वयंपाक करत आले.

संभूस.ः पण बाबूच्या आई बाबूला सांगून गॅस घ्याच तुम्ही.

राधाक्काः ऐकायला हवा ना.अहो ते रेडिओचं खोकं बंद पडलंय ते नाय दुरूस्त करून घेतलन.नि बायकोला तो टिव्ही का काय तो हवा होता.ते परवडणार होतं का रिक्षावाल्याला.आता आयशीसाठी गॅस महाग पडतो म्हणे.ह्याचं हे असं नि दत्तू कधी तोंडच दाखवत नाही.नाही तर त्याला सांगितलं असतं.बुवा असतानाच लग्न करून जो गेला तो गेलाच.एकदाच सुनेचं तोंड बघितलं.जातीबाहेरची आहे ना.

संभूसः म्हंजे थोरला कधीच आला नाही नंतर ?

राधाक्काः आलावता.एकटाच; आज्ज्याचे पिंड घालायला.आमचं ध्यान आधीच निघून गेलेलं यात्रेला. बाप हयात असतांना दत्तूला आज्ज्याचे पिंड घालायला लागले.बाबू लहान होता ना तसा.

..एवढयात टॉवेल गुंडाळलेला जेरे मास्तर रिकामी बादली नि खांद्यावर पिळा घेऊन उजव्या विंगेतून येतो.मागे वळून बादली पुन्हा गळक्या नळाखाली सरकवतो. ..बादली भरत असतांनाचा हळूहळू उतरता आवाज..

राधाक्काः झाली का अंघोळ मास्तर ? आज लवकर जायचंय वाटतं शाळेला ?

मास्तरः (जरा त्रासल्यागत)शाळेला नाही हो.आमची लेक यायच्येय सोलापूराकडनं. गाडी कळवलीन नाही.फुकट ताप नुसता.शाळेतनं फोन लावला होता, तिकडच्या घरमालकांकडे. पण काय ऐकू येत नव्हतं. मोबाईल पोहोचले नाय्येत ना.पहातो जाऊन.पण बहुतेक सिद्धेश्वर असेल.आली असेल तर चुकामूक नको व्हायला.

..संभूस मामी घरात जाता जाता ओटयावर आपल्या दाराशी थांबून ऐकते...

राधाक्काः अग्गोबाई..हो का ? ऐकलंत का भास्करच्या आई ? (संभूस मामीकडे वळून बघते.)

राधाक्काः ती गेल्यासाली पास झाली ती का ? विभा का कोण ती ?

मास्तरः ती नाही हो.ती जातेय कॉलेजला.ही तिच्याहून थोरली प्रभा.दाखवायला न्यायचंय डोंबिवलीत.अंमळ उशीरच झालाय लग्नाला.पण शिकली नाही फार म्हणून नोकरी नाही. तसं थोडंफार शिलाईचं नि ते मेंदीबिंदीचं काम शिकलीय पण स्वतः अजागळासारखी रहाते.कोण पसंत करणार..शिवाय नोकरी अशी नाहीच ना.म्हणून अडतंय जागजागी.मी शाळामास्तर! हुंडा तरी कुठनं आणणार ?

(संभूसमामी मान वेळावत घरात जाते.)

राधाक्काः होईल हो वेळ आली कि. (सूचकपणे..)ती यावी मात्र लागते.मग मिळेल एखादा आजूबाजूलाच.

..मास्तर न बोलता घरात जातो.राधाक्का एका हातात दोन लाकडं नि एकात दुधाचा तांब्या घेऊन आत जाते..स्वतःशीच बडबडत..

राधाक्काः आता आधी अंघोळ.आज तीही गार पाण्याची.मग चुलीला लाकडं लावते. गोळाभर भात तरी शिजवायलाच हवा.तो मुडदा येऊन हजर होईल गिळायला...

.. ..क्षणभर अंधार आणि प्रकाशझोतात वास्तूपुरूषः .. ..

वास्तूपुरूषः हे असं आहे.ही बाई शिव्या दिल्याशिवाय बोलूच शकत नाही. लेकरालाही शिवीशिवाय हाक मारत नाही.सारखं मेल्या मुड्या सुरू असतं. एखादवेळी मी चुकून तथास्तु म्हटलं तर ? बोलाफुलाला गांठ पडली तर ही एकटी बाई माणूस जाईल कुठे ..एक का होईना पण येडंबागडं असलं तरी पोर जवळ आहे.उचापतखोर आहे पण म्हणूनच टिकून आहे.दोन पोरं दोन टोकाची..आणि नवरा नसल्यातच जमा. हिलाच कंटाळून गेला असेल.पण ही मात्र शिव्या देत का होईना त्याचीच वाट बघतेय.शेवटी अंग टाकायला इथेच येईल म्हणून.म्हातारपण निभावून नेतेय कसंतरी.

..क्षणभर अंधार.. हळू हळू पसरणारा दिवसाचा प्रकाश ..

(धुतलेल्या लुगडयाचा पिळा खांद्यावर घेतलेली राधाक्का बाहेर येते नि झटकून उजव्या बाजूच्या ओटीच्या कठडयावर पसरते नि आत जाते.)

(कपडे केलेला मास्तर आपल्या खोलीतून बाहेर येऊन राधाक्काच्या पायरीजवळ उभा राहून हाका मारतो.)

मास्तरः राधाक्का, ही चावी.तो रेडिओ शोभेचा आहे का हो ? लावावा ना कधीतरी. आणि बाबूरावांना म्हणावं गेटाला कायतरी झडपा लावा. मोकाट कुत्री आत यायला लागल्येत आताशे.रात्रभर कोकलत असतातच. झोपू म्हणून देत नाहीत..

..राधाक्का कांहीच न ऐकल्यासारखं करत पितळी फुलपात्रात दूध घेऊन पायरीजवळ येते.. .

राधाक्काः मास्तर; आज फुलं वेचली नाहीत.मागच्या चाफ्याखाली सडा पडलाय नुसता.पूजा केली नाहीत वाटतं ?

मास्तरः पूजा कसली करताय ! आधीच उशीर झालाय.

..मास्तर चावी राधाक्कांच्या हाती देऊन गेटातून जातो...

राधाक्काः आता हे सांगणार आम्हाला गेटं लावा म्हणून.जसे हेच मालक घराचे. असं काय हजारांनी भाडं देतायत.वर हे एक काम देऊन जाणार रोज ; ह्याच्या घराची राखण करायचं.. ..

..असं म्हणत चावी कोप-यातल्या डेस्कावर ठेवून पायरी उतरते.वळसा घालून मागे जायला वळते...

..इतक्यात संभूसमामी गेटाच्या बाजूला खांबाजवळ ठेवलेल्या डब्यातल्या तुळशीच्या रोपाला पाणी घालायला येते. आपल्या दारातूनच...

संभूस : आता आणि कुठे निघालात फुलपात्र घेऊन ?

राधाक्का: तापवायच्या आधी उलीसं दूध काढून ठेवलंय.तिला निरसं लागतं ना.

संभूस : ती कोण आणि ? तीही पाठीमागच्या बाजूला ?

राधाक्का: ती बसलेय ना माझी लेक.सुंद्री..माझी मांजरी हो. गर्भार आहे.वाढत्या देहाची. आता मागच्या छपराच्या सांदितनं यायला होत नाही तिला. न्हाणीच्या खिडकीजवळ ओरडत होती आत्ता.छपरावरच फिरत असते.उंदिर मात्र कमी झाले तिची जाग झाल्यापास्नं.

संभूस : धन्य तुमची.लेकाला शिव्या घालताय नि मांजरीचे लाड करताय .

..फुलपात्र ओटीच्या पायरीवर ठेवून डावा हात कमरेवर घेऊन उभी रहाते...

राधाक्का: अहोऽऽ .नवा जीव मग तो कोणाचाही असो; जन्माला यायचा म्हणजे सोहळाच तो एक.नातवंडं खेळवायचं नाही नशीबात.

संभूस : देवदत्ताची मुलं आलीच असतील ना कधीतरी.

राधाक्का: मग कशाला हवं होतं ! ती तिकडेच वाढली आजोळी प्रधानांच्या घरी नि हिला नकोच होतं.परत जायचं होतं ना, होते ते दोन डाग घेऊन. सारखी म्हणायची एवढयात मूल नको म्हणून, तेव्हांच संशय यायला हवा होता.

संभूस : म्हणजे ? चक्क दागिने घेऊन गेली ?

राधाक्का: होय हो.जवळजवळ तसंच.माझं स्त्रीधन म्हटल्यावर काय बोलणार.थोडी आशा वाटत होती कि त्या निमित्ताने कधीतरी येईल परत. आणि होतं काय म्हणा असं ? माझ्या पाटल्या मोडून घातलेले दोन बिलवर नि गंठण.

संभूसः मग तुम्हाला कांहीच उरलं नाही !

राधाक्काः आहे कि .हे काय.पांढरं पडलेलं माझं सौभाग्य.ह्या दोन वाटया नि ही कुडकं.माहेरची बोरमाळ आमच्या फुकटयाने विकली यात्रेला जायचं सांगून. सासूने सुनमुखाच्या वेळी माझ्या खोप्यावर हौसेनी घातलेलं अग्रफूल तेवढं -हायलंय्. ठेवलंय थोरलीसाठी.ती कुठली यायला.दत्तूच कधी आला तर देईन पाठवून.

संभूसः अजूनी आशा वाटतेय ती येईल म्हणून ?

राधाक्काः (एक सुस्कारा !) भारी चिवट असते हो आशा.म्हणून तर राह्यले ना; बावीस वर्ष ही लेणी संभाळत त्याची वाट बघत; ! .. (मंगळसूत्र दाखवते.)हा बाब्या धड असता तर बायको कशाला माहेरी गेली असती ? एव्हांना नातवंडाची मुंज बघितली असती.

संभूसः कित्ती वर्ष झालीयेत तिला जाऊन.आम्ही वाडयात यायच्या आधीपास्नंच गेलीय भास्कर म्याट्रिक पास झाला त्या वर्षीच हे गेले.म्हणून तर रिक्षा टाकली त्याने.

राधाक्काः दोघांनी एकदमच टाकल्या ना रिक्षा ?

संभूसः छे हो.तुमचा उद्धव आधीच चालवत होता.म्हंजे आम्ही इथे यायच्या आधीपास्नंच.

राधाक्काः असेल.म्हंजे बघा आमचं ध्यान गेलं घरातनं तेव्हां बुवा होते.दोनच वर्षात गेले पुढे.दिवसांना आलावता तेव्हांच दत्तूला म्हटलं कि बाब्याला घेऊन जा.त्याची विद्या कर तर मलाच चार गोष्टी सुनावत म्हणाला ; . .. 'बराय टांगा चालवतोय ते.तुलाही हौस होतीच ना पालखीतनं मिरवल्यागत घरच्या टांग्यातनं देवदर्शनाला नि हळदीकुंकवाला जायची.' ..तेवढं बरिक लक्षात ठेवलन्.

संभूसः म्हंजे ? खरंच तुम्ही जायचात टांग्यातनं ? तेही त्या काळात?

राधाक्काः मग काय तर ! घोडं नुसतंच उभं दारात.म्हंजे बुवा किर्तनासाठी दौ-यावर जायचे तेव्हां हो.दत्तू हॉश्टेलात होता शिकायला तेव्हांची गोष्ट.रामाला जायचे तेव्हां मोतद्दार असायचा बरोबर.सासूचा शेला पांघरून नथ घालून हळदीकुंकवाला जायची तेव्हां बाब्याचा बापसुद्धा बघत रहायचा.अगदी धन्य धन्य वाटायचं.. आणि दुसरा विरंगुळा कुठला असायला.

संभूसः सासुरवाशणींना घराबाहेर पडायला तेच एक निमित्त.

राधाक्काः तर हो SSS.त्या गडबोल्यांच्या काकी आवर्जून बोलवायच्या चैत्रगौरीच्या हळदीकुंकवाला.संस्थानातलं माहेर त्यांचं.केवढा थाटमाट करायच्या ! चांदीच्या पंचपात्रीतनं वाळयाचं सरबत , केशर घातलेलं.नि कायकाय.त्यांचे यजमान म्हणे कधीकाळी तिकडे हैदराबादेत का कुठल्याशा संस्थानात जज्ज होते .पुढे मुलांच्या राज्यात काय मग आमच्यासारखंच झालं सगळं..काप गेले नि भोकं राह्यली, बंदच झालं सगळं एकेक करून. आमचाही हा बाबा घर सोडून गेला नि लोकांनी मग मला वाळीतच टाकल्यासारखं केलं. त्यांच्या लेखी मी सवाष्ण नव्हतेच जणू.म्हणून तर माझं जगाशी वाकडं. बोलते म्हणून तोंड दिसतं पण माझ्या सुनेची मंगळागौर देखील झाली नाही हो वाड्यात .. (डोळयांना पदर लावते.)

संभूसः  आपलं माणूस धड नसलं कि असंच सोसावं लागतं हो. पण निदान चार सुखाचे दिवस तरी आले म्हणायचे तुमच्या वाटयाला.

राधाक्काः (उपहासाने) हो तर.हेच ते सुख.वहातंय ह्या बाब्याच्या रूपाने.तेही सतरा वर्षांनी. सासूबाई होत्या तोवर कसली कसली औषध द्यायच्या वाटून; दुर्वांचा रस नि तांदूळाच्या धुवणातून .

संभूसः औषध ? ती आणि कशाला ?

राधाक्काः तेही माझंच कर्म ! दत्तू अशक्त होता आणि बोलत नव्हता खूप दिवस. तेव्हां तसलंच वेडवाकडं अजून एखादं मूल नको व्हायला म्हणून.त्या गेल्या नि हे समोर आलं.बाब्याच्याही डोळयात दोष आहेच.पण हातीपायी धडधाकट झाला नि मी सुटकेचा श्वास घेतला.सतरा वर्षांनी बाळंतपण..खरं तर इतकं अवघडल्यासारखं झालेलं बुवांच्या समोर वावरतांना.

संभूसः पण म्हणून उद्धव लाडका झाला का बुवांचा ?

राधाक्काः तर हो.त्यांच्या पुढयात बसून पान मागायला लागला.बुवाही द्यायचे कौतुकाने. पुढे जरा मोठा झाल्यावर जायला लागला त्यांच्याबरोबर गांवात.पण ते बरिक वाईट झालं हो. आता उठसूठ मावा खायची संवय लागली ना.

संभूसः मग देवदत्त कधी आलाच नाही पुढे?

राधाक्काः काय सांगू कर्म माझं.तुमच्या जागेत पूर्वी मुळेकाका होते ना.त्यांनी पाठवलेलं पत्र ; बाब्याच्या लग्नाचं. आधी मुली सांगूनच येत नव्हत्या, मुळेकाकांनीच

त्यांच्या शाखेची आणली ही बेळगांवची.तर साधे आशिर्वादाचे चार शब्द नाही लिहीलेन; तो देवकाला कुठला यायला.ते बिचारे सडे.त्यानीच मग सुपारी लावून बाब्याचं देवक ठेवलं.

संभूसः पण तुमची विचारपूस करायला तरी यायचं केव्हांतरी .

राधाक्काः  कसा येईल ? आयशीला पैसे द्यावे लागतील ही भीति ! स्वार्थी मेला. मुरबाडला गेलावता; परस्पर जमिनी विकून पैसे काढायला. पण जमलं नाही.

संभूसः  त्यात जमायचंय काय त्याला ? तो तर चांगला प्रोफेसर.

राधाक्काः मी अंगठा दिला नाही ना. आधी म्हटलं माझी सोय लाव.मला बाब्याला वाढवायचाय.आणि मी काय खाऊ बसून? म्हणून तर माझ्यावर राग धरून गेला.

संभूसः बरं बाई तोंड दिलंत सगळयाला.

राधाक्काः न देऊन सांगते कोणाला.एके काळी गांवातलं नांवाजलेलं घराणं आमचं. पुराणिकबुवांची सून. मी काय लोकांच्या पोळया लाटायला जाणार होते ? तेव्हांच आणि हा बाब्या म्याट्रिक का काय ते नापास झाला नि टांगा चालवायला लागला. कधीकाळी सोन्याची सलकडी घालून डोक्याला जरीचा रूमाल बांधलेले बुवा टांग्यातनं पंचक्रोशीत कीर्तनाला नि देवदर्शनाला जात.त्या बुवांसाठी ठेवलेला टांगा गावातल्या सवा-या घ्यायला लागला. पैशांसाठी ! काय देवाचा न्याय बघा.

संभूसः मग ? पुढे रिक्षा घेतली का ?

राधाक्काः बुवांचा मोतद्दार गेलाच होता ना.घोडयाचं सगळं कोण बघणार ? मग त्यालाच बोलावून टांगा देऊन टाकला नि रिक्षा घेतली.

..एवढयात मांजरीचा आवाज येतो..

संभूसः .. आपल्या दारातून टाचा उंचावून छपराकडे बघत ..बाबूच्या आई; तुमची ती सुंद्री हाका मारत्येय बहुतेक तुम्हाला.

राधाक्काः  आले ग बाई आले.मी तरी काय बोलत बसलेय चुलीला लाकडं लावून. पेटलीसुद्धा असतील.सुंद्रे ऽऽऽ  ये ग माझे बाई..(मार्मीकडे बघत)..व्यायला झाल्येय आता.एखादं जुनेरं नेऊन ठेवते बखळीत. ( ओटीवरचं फुलपात्र उचलते).

संभूसः आता तिचं बाळंतपण करणारात का काय ?

राधाक्काः काय करू ! सुना काय लाभल्या नाहीत मला.माणसांचं नाही तर नाही निदान मांजरीचं तरी करीन !

..दोघी जातात.मामी घरात आणि राधाक्का उजव्या विंगेतून मागच्या बाजूला..

..पुन्हा अंधार नि हळूहळू पसरणारा सकाळच्या नऊ वाजण्याच्या सुमाराचा प्रकाश गेटाबाहेर रिक्षा थांबल्याचा आवाज.पाठोपाठ मास्तरांचा..

मास्तरः इतना कैसे हुवा ?

रिक्षावालाः मास्तर मराठीत बोला.माजी पोर हाय तुमच्या साळत.

मास्तरः मला वाटलं ;

रिक्षावालाः का भैय्या हाय म्हून..हितं पोचले नाय अजून ते.पैसे कहाडा लवकर.

..थोडं थांबून मास्तर गेटातनं आत शिरताना..

मास्तरः बोलण्यात गुंतवून पैसे जास्तच घेऊन गेला.फिरवून आणलं उगाच पुण्यातल्यासारखं.ये ग प्रभे.

..हातात ट्रंकेसारखी दिसणारी बॅग घेऊन मास्तर नि मागोमाग इकडेतिकडे बघत त्यांची मुलगी प्रभा प्रवेशतात ..
..प्रभा गुंडाळल्यागत साडी नेसून एक शेपटा पुढे घेतलेली.हातात रंगीत झालर लावलेली कापडाची पिशवी छातीशी घट्ट धरलेली. ..

मास्तरः नशीब ह्या ट्रंकेवर वळकटी नाही बांधून आणलीस..आणि ती पिशवी कशाला कवटाळून धरल्येस ?

प्रभाः अहो आईनं भोकराचं लोणचं दिलंय तुमच्यासाठनं.ते सांडू नये म्हणून...

..ती हे म्हणतेय तोच भास्कर; मामींचा जरा ब-या कपडयातला रिक्षावाला वाटू नये असा पंचवीशीचा तरूण मुलगा आपल्या दारातली पायरी उतरून सामोरा येतो नि अचंबित होऊन केसांवर हात फिरवत तिच्याकडे पहातो.पुढे गेलेले मास्तर मागे वळून प्रभेला.. ..

मास्तरः ये ग प्रभे. (मग भास्करला) काय भास्करराव अजून गेला नाहीत वाटतं ?

भास्करः पहाटे जाऊन आलो कि...आता परत चाललो.

मास्तरः मग दिसला नाहीस स्टेशनला ते ?

..प्रभा हातातली पिशवी हलवत हंसून भास्करकडे बघते.तिला...

मास्तरः अगं प्रभे. पाडशील ना वेंधळे.लोणच्याची बाटली आहे ना ? मग ?

..तिच्या अवताराकडे बघत भास्कर गेटात शिरतो.इकडे आवाज ऐकून मामी दारात येतात. प्रभाचं ध्यान बघून तोंड वेंगाडत.. ..

संभूसः आलात का मास्तर लेकीला घेऊन ?.

..मास्तर त्याच्या दाराजवळ जातो. मागे प्रभा खरंच वेंधळयासारखी शरिर घुसळत उभी रहाते. मास्तर ट्रंक ठेवून आधी खिशात हात घालतो.लक्षात येऊन राधाक्कांच्या ओसरीकडे येतो नि हाका मारतो. ...

मास्तरः राधाक्का , अहो मालकिणबाई.. द्या कि आमची किल्ली.

संभूसः राधाक्का मागे गेल्यात त्यांच्या त्या सुंद्रीला दूध द्यायला.किल्ली तिथेच असेल नेहमीच्या जागी.त्या डेस्कावर.

..मास्तर चप्पल काढून चावी घेतो नि संवयीने करावा तसा त्या सरस्वतीच्या कि बुवांच्या तसबिरीला नमस्कार करतो.दार उघडून बापलेक घरात जातात तशी मामी पण जातात..
..इकडे गेटाबाहेर गेलेला भास्कर परतून येतो नि मुद्दाम डोकावल्यागत

मास्तरांच्या दाराकडे बघून कुत्सित हंसतो एवढयात बाबू आपल्या घराकडे बघत भास्करावर येऊन आदळतो.तोंडावर बोट ठेवून भास्कराला चूप अशी खूण करतो.

भास्करः बाबू तू ? सकाळी गेला नव्हतास स्टेशनला ?

बाबूः नायरे..इथेच होतो पुढच्या चौकात.त्या बिल्डरच्या मॅनेजरशी बोलत.पंटर साला. मास्तरांना गेटात शिरतांना बघून आलो.बरोबर कोण पार्सल आणलंय ते बघायला.म्हातारी बहुतेक मागच्या बाजूला गेल्येय. तू घेऊन आलास त्यांना ?

भास्करः नाय रे. मी मघाशीच आलेलो, नाश्ता करायला तर आई म्हणते जेवूनच जा आल्यासारखा.

बाबूः एवढया लवकर ? फेकू नको.वडापाव नाय भेटला स्टेशनला? का तू पण ते पार्सल बघायला आलायस परत ?

भास्करः (तोंडावर बोट ठेवून.) कायपण ध्यान आहे.त्याला काय बघायचंय ?.

बाबूः तरी आलास परत. तुझ्या उपयोगाचं नाही ते. चल हवा आने दे.आपली लाईन क्लिअर.(गॉगल सरळ करतो )

भास्करः काय तू पण बाबू. सकाळी सकाळी एवढा तमाशा केला राधाक्कांनी.

बाबूः त्या साल्या चिन्नाने चुगली केली नुस्तं बघितलं म्हणून.आता म्हातारीला पटवली पाह्यजे कायतरी करून.सारखी मुड्या मुड्या म्हणत असते येताजाता. दाखवतोच तिला आता.

इतक्यात मागच्या बाजूने बडबडत राधाक्का येते.

राधाक्काः मामी; अहो मामी...

बाबूः चल भाग.म्हातारी आली वाटतं .जातो स्टेशनला.

..दोघं जातात नि राधाक्का स्वतःशीच बडबडत येते..

राधाक्काः  तुम्हाला सांगते मामी आमच्या ह्या बयाला चार तरी पोरं होणार बहुतेक. केवढं पोट वाढलंय.बोक्यापासून मात्र जपायला हवं.खायचा एखादं पोर.

..त्यांच्या दाराकडे बघते.मामीचा पत्ता नाही.ती एकटीच बडबडत पायरी चढते..

राधाक्काः विस्तव विझून गेला असेल.आधण ठेवलं ते अर्ध झालं असेल आटून.

..आत जाणार तो प्रभा आपलं दार उघडून नळाकडे पाय धुवून बादली आत घेऊन जाते.तिच्याकडे बघून.. .

राधाक्काः अग्गो बाई ऽऽ ..आली का मास्तरांची माहेरवाशीण ?

मास्तरः (शर्ट काढून बाहेर येत)  प्रभे पाय धुतले का ?

प्रभाः अंघोळच करते आधी.

मास्तरः अगं पण. हे कुठे घेऊन चाललीस ?

प्रभाः मोरीतल्या नळाला पाणीच येत नाहीय.

मास्तरः आत स्टोव्ह पेटवलाय.आता चहा कर आधी नि मग पाणी तापवून घे.मी मागे जाऊन येतो तोवर. (कानाला जानवं लावतो.)

राधाक्काः काय मास्तर आल्याआल्या लेकीला कामाला लावताय.उद्या गेली कुठे ते डोंबिवलीला का कुठे कि मग येणारेय का रोज चहा करायला ?

(प्रभा लाजून स्वतःभोवती गिरकी घेत घरात जाते.)

राधाक्का : आणि तुमचा गॅस कधी यायचा ? रोज का ती स्टोव्ह पेटवत बसणारे?

मास्तरः एकटया माणसाला करायचाय काय गॅस.रोज खानावळीत जेवणार.
ते समाधानवाले बुरकुले घालताहेत ना जेवायला.

राधाक्काः आता ही आलीय ना.घालील चार दिवस करून इथे असेतोवर.येतंय् का पण कांही ?  नाहीतर आमच्या सुनेसारखं.आमटीत दूध नि चहाला फोडणी !

मास्तरः ही जाईल हो परत चार दिवसांनी.मग कोण करत बसणाराय ती उस्तवारी ?

राधाक्काः अहो परत कशाला पाठवताय.ते डोंबिवलीचं काय म्हणताय ते जमलं तर.

मास्तरः खडा टाकून बघितलाय.पण हुंडयाबिंडयाचं काय झेपायचं नाय आपल्याला मग हे पार्सल परतच पाठवायला पाह्यजे ना.

..एवढयात गेटातनं आत शिरलेला भास्कर..

भास्करः (सहेतुकपणे ) काय मास्तर कुठे पाठवताय पार्सल ?

मास्तरः ते तुम्हाला नाही कळायचं. (मास्तर मागे पायखान्याकडे जातो.)

राधाक्काः अरे भास्करा, आज लवकर कसा आलास बाबा जेवायला ?

भास्करः इकडची सवारी मिळाली तर म्हटलं नाश्ता करून जावं शाळेच्या पोरांना घेऊन. तर आई म्हणते जेवूनच जा.आई वाढ ग..

..संभूस मामी त्यांच्या दाराशी येऊन आत जाते.
..भास्कर नळाकडे हातपाय धुवायला जातो; मास्तरांच्या दाराकडे बघत..

राधाक्काः सवारी मिळाली म्हणून कि सवारी शोधत आलास ?

भास्करः माझ्याकडे लाईन लागते स्टेशनवरच्या पॅसेंजरांची.आपण मावा खात टाईमपास करत नाय.बाबूराव पण आले असतील ना जेवायला ?

राधाक्काः तुला भेटला नाई स्टेशनावर ?

भास्करः कसा भेटणार? असायला पायजे ना तिथे .मघाशी रिक्षा तर इथेच  होती त्याची.काय माहित कुठे जातात त्याच्या सवा-या.

राधाक्का: म्हंजे ? तू बघितलंस का कुठे कांही ?

भास्कर: नाय बा. तो असतो त्याच्या त्या ऽऽऽ मित्रांच्यात.

राधाक्का: आता येईल गिळायला मुडदा कि मग आडवा. झोपा काढायला हव्यात नुसत्या. अशाने धंदा होणारेय ?

.. .आवाज ऐकून बाहेर डोकवायला आलेल्या प्रभाकडे बघत बघत...

भास्कर: होईल हो..होईल धंदा..आता चांगलाच होईल. (असं म्हणत घरात जातो.)

..मास्तर नळाखाली पाय धुतल्यासारखं करत कानाचं जानवं काढतो नि प्रभाला बाहेर बघून...

मास्तर: तू काय बघत उभी इथे ? चहा उकळून जाईल. काढा नकोय मला. आणि अंगधुणं व्हायचंय ना ?

..दोघं घरात जातात. राधाक्काही स्वतःशीच बडबडत आत जायला वळते. ती मधल्या दाराशी पाठमोरी..

राधाक्का: (स्वतःशीच ) आता आधी स्वयंपाकाचं बघू दे. हे येडं येईलच इतक्यात वडापाव हादडून. त्याला ताकभात तरी वाढीन.

..एवढयात गेटातनं डोक्याला पट्टी बांधलेल्या बाबूला दोन्ही बाजूला धरून दोन अनोळखी इसम येतात. समोर कोणीच नाही असं बघून बाबू त्यांचे हात सोडवून स्वतःच कपाळावरची पट्टी घट्ट करतो नेहमीचा गॉगल खिशात ठेवून त्यांच्या हातात हात देत..

बाबू: ठीकसे पकडना. हां ऐसे. अब आवाज देना.

एकजण: मराठीत बोल ना बाब्या.

बाबू: नाय. तूबी हिंदी बोल.

पहिला: ए अम्मा; देख तेरे बेटेको क्या होगया.

बाबूः   हां अस्सं !

..दाराशी गेलेली पाठमोरी राधाक्का मागे वळते नि पहातच रहाते.हे दोघं बाबूला बाकड्यावर बसवून निघतात..

दुसराः अब हलदीका दूध पिला देना उसको.भोत मार पडी है..(दोघं जातात)

भानावर आलेली राधाक्का जमिनीवर बसकण घेत..

राधाक्काः अरे माझ्या कर्मा..बाब्या काय करून बसलायस हे ?

बाबूः गप ग.उगा गळा काढू नको.नौटंकी.तुझ्या शिव्या कारणी लागल्या. सारखं मेल्या मुड्द्या म्हणत असतेस.

राधाक्काः ते काय तू मरावास म्हणून नाही कांही.

बाबूः तरी सकाळी सकाळी भवानीच्या टायमाला नाट लावलास.झाडू घेऊन मागे धावलीस त्या चिन्नाचं ऐकून.

राधाक्काः मग तिच्या लोकांनी काय केलं की काय ?

बाबूः परत परत तेच ? ते लोकं कशाला येतील इथे ?

राधाक्काः नस्ते उपद्व्याप करून ठेवतोस.बायको माहेरी निघून गेल्यापास्नं बेताल झालायस.कानीकपाळी ओरडत होते..त्या अवदसेला बाबापुता करून घेऊन ये.

बाबूः ती यायला बसल्ये एवढया वर्षांनी.मग तेव्हांच कशाला गेली असती..पण हा धृतराष्ट्र तिला पसंत नव्हता ना.

राधाक्का ः माहेरी ते टिव्हीचं डबडं आहे ना.त्यात बघितलं असेल कांही बाही.

बाबूः बापसाने दुसरं लग्न लावून पण दिलं असेल एव्हांना....आणि तिचा काय संबंध इथे ?

राधाक्का: म्हंजे उकिरडयात डोकवायला जायचा नाहीस.नि असला मार पडायचा नाही.

बाबू: तो पडणारच.तुला काय वाटलं हे चिन्नाच्या लोकांनी केलं ? बाजूला त्या बिल्डरची माणसं चकरा मारतायत.बघून घेईन साल्याना ..

राधाक्का: म्हणजे ?ते तुझ्या जिवावर कशाला उठतील ?

बाबू: तुझ्यामुळे.तू नागोबासारखी कवटाळुन बसलीयेस ह्या जुन्या इस्टेटीला..

राधाक्का: मग काय करू ? तुमचा बाप येईलच ना शेवटच्या घटकेला अंग टाकायला.त्याला काय तोंड दाखवू मग ?

बाबू: कुणास ठाऊक आहे तरी कां !

राधाक्का: बाब्या; मेल्या जीभ रेटतीय् कशी हे बोलायला? मुलगा कां वैरी तू त्याचा?

..समोरून भास्कर हात धुवायला येतो नि बघतच रहातो.त्याच्याकडे पहात बाबू डोळा मारतो. हात वर करून इशारा करतो...

बाबू: चांगला स्टेशनवर गेलो होतो.विचार भास्करला.

..राधाक्का भास्करकडे बघत ..

राधाक्का: आत्ताच तर विचारलं होतं. तर दिसला नाही म्हणाला.

..बाबू भास्करकडे बघत हळूच मान हलवतो..

भास्कर: म्हंजे बाबूच्या आई.सकाळी गेला होता हो तो.

राधाक्का: मग होती कोण ती लोकं ?

बाबूः  बघितलं असतं तर काय पाह्यजे होतं.सरळ आले नि दोन बाजूने येऊन बरगड्यातनं बुकलायलाच लागले. (भास्करकडे बघत)

बाबूः तुला तर म्हायत्येय ना भास्कर.आपण कोणाच्या अध्यामध्यात नसतो.जाऊदे. माझा  गॉगल पडलाय तिथे गेटाबाहेर कुठे तरी तो बघून येतो..

राधाक्काः कांही नको उठायला.भास्कर बघेल.झोपा आता..जराशाने वाढते गिळायला.बाहेर हादडून झालंच असेल.

..भास्कर खांदे उडवीत घरात जातो तेव्हां प्रभा दाराशी येते.केस बांधलेले नि साडी बदललेली. समोर बघते तो बाबू आडवा होता होता पुन्हा उठून बसतो. प्रभा हातात वाटी घेऊन ओटीच्या पायरीशी येते..

प्रभाः आईनं दिलंय.भोकराचं लोणाचं.

..बाबू आशाळभूतासारखा बघत रहातो.मास्तर दाराशी येत ..

मास्तरः प्रभे झालं का देऊन ? ये माघारी.अजून भात करायचाय.

राधाक्काः मास्तर तुम्हीसुद्धा कमाल करताय.प्रवासातनं आल्ये ना ? तिला कामं सांगताय ? मी टाकत्येच आहे भात इकडे.ठेव गं पोरी ते.जराशाने ये मात्र भात न्यायला.

प्रभाः मग मी पिठलं करते तिकडेच.आईने बेसन दिलंय थोडं (बाबूकडे बघत) तुम्हाला  उशिर नको व्हायला..

राधाक्काः समजूतदार आहे पोर.जा कर जा काय ते.

..ती जाते नि बाबू तिकडे बघत पुन्हा आडवा होतो. ..

राधाक्काः काय रे ? जायचं ना होतं तुझा तो गॉगल शोधायला ?

बाबूः तूच भास्करला सांगितलंस ना; तो जाईल.नाहीतर मग जराशाने जाईन; जेवून झाल्यावर.

राधाक्काः  तोवर रहाणार आहे तो ?

बाबूः  रिक्षावाल्याने बघितला तर नक्की देईल स्टेशनवर !

राधाक्काः तोवर काय असाच रहाणारैस ? डोळयांवरनं लोकं काय काय बोलतात ते चालेल का ?

बाबूः कोण नाय काय बोलत ! (मास्तरांच्या खोलीकडे बघत आडवा होतो तेव्हां खिशातनं गॉगल पडतो तो पट्कन उचलून घेतो.)

राधाक्काः  काय रे ? काय पडलं ?

बाबूः  काय नाय .. . तू जा आपल्या कामाला. (पुन्हा आडवा होतो..)

..राधाक्का मास्तरांच्या खोलीकडे बघते नि हंसत आत जाते...
..दारात चपला सरकवत बाहेर पडतां पडता भास्कर मास्तरांच्या खोलीकडे बघत पायरी उतरतो. ..
..बाबू बाकडयावरनं उठून शिटी घालतो.भास्कर दचकून पहातो बाबू आतल्या दाराकडे बघत त्याला खिशातला गॉगल दाखवून डाव्या विंगेजवळच्या विहीर नि पार ह्यांच्याकडे बोट दाखवत बोलावतो. ..

बाबूः (दाराकडे बघत पाराजवळ जाऊन गॉगल भास्करच्या हातात देत.)नंतर दे आणून म्हातारीसमोर. आणि भास्करा , तुझा काय, विचार काय आहे ?

भास्करः विचार कसला ? मी चाललो रिक्षा घेऊन..

बाबूः  तिकडे काय बघत होतास ?

भास्करः काय बघायचंय ? ते सॅम्पल ?

बाबूः नाय ! म्हंजे तो आपला आयटम आहे.

भास्करः (तुच्छतेने त्याच्याकडे पायापासून डोक्यापर्यंत बघून छद्‌मी हंसतो ) मग बघत बस दिवसभर.रिक्षा बंद ठेवून.पण गॉगल लावूनच बघ हां.तिला तुझे डोळे दिसले तर .. ..तो मास्तर तुला उभा करील काय ?

बाबूः ते बघू.तिला काय दिवसभर झांकून ठेवील काय ? तू फांदा मारू नको म्हंजे झालं.

भास्करः ते आपल्या कामाचं नाय.एका रिक्षावर संसार करायचा काय ? आपण नोकरीवाली पटवणार.डायरेक्ट शाळा मास्तरीण.

बाबूः अच्छा.म्हणून शाळेच्या पोरांना पोहोचवायला जातो काय ? असाही हा माल तुझ्या कामाचा नाय. मोठी आहे तुझ्यापेक्षा !

भास्करः  आणि तुझ्यापेक्षा लहान! तुला काऽऽय.कोणीही चालेल. चिन्नासुद्धा!

बाबूः ती नुस्ती बघायला रे.जाने दे..अब बुढढीको पटाना है.

..कुत्सित हंसत भास्कर गेटबाहेर जातो. ..

..अंधार नि उजेड..

..राधाक्का बाकड्यावरनं बाबूची चादर उचलून घडी करते..

राधाक्काः (स्वतःशीच ) संध्याकाळ होईपर्यंत लोळत पडला नि आता गेला उनाडायला.खरंच रिक्षा चालवतो का आणखी काय उद्योग करतो देव जाणे.लोकांना काऽऽऽय फुकटचे तमाशे हवेच असतात बघायला.

..आपल्या दारातून राधाक्काची बडबड ऐकत पायरी उतरून संभूसमामी आधी घरामागे डोकावते नि मग राधाक्काच्या घराच्या पायरीवर उभी रहाते. ..

संभूसः बाबूच्या आई.तुम्ही उगाच लोकांवर संशय घेऊ नका.तुमचा बाबूच त्या बिल्डराला मिळालाय् बहुतेक.

राधाक्काः हे कोण म्हणालं आणि तुम्हाला ?’

संभूसः कोणी येऊन सांगणाराय् कां असल्या गोष्टी ? अहो त्या खिडक्यांच्याखाली ते पावभाजीच्या नि कसल्या कसल्या गाडया लावून असतात ना रात्रीपर्यंत त्यांच्या इथल्या गुंडांशी गप्पा चालतायत.भास्करने ऐकलंय कि ते म्हणे म्हणत होते . 'स्टेशनवर बाबूच बिल्डरच्या माणसाना भेटतो.'

राधाक्काः  ते कशाला आणि ? आणि तेही चोरून ?'

संभूसः तुम्हाला वाटावं  गुंड बाबूला मारहाण करतायत.पण तोच म्हणे त्याना सुपारी देतो.खोटी खोटी.आजचं नाटक तुम्हाला खरं वाटलं का ?'

राधाक्काः म्हंजे ?कपाळाला पट्टी बांधून आलाय कि तो. ते लोकं पोचवायला आलेले.'

संभूसः सगळं नाटक.ठरवून केलेलं.भास्करने बघितलं तेव्हां बाबू स्वतःच्या पायांनी रिक्षातनं उतरून गेटापर्यंत चांऽऽऽगला सरळ चालत आला.मग दोघांनी धरला त्याला.

राधाक्काः म्हंजे हया सैतानालाच घाई झालीय् का इस्टेट विकायची.'

संभूसः वर आणि तो दुसरी रिक्शापण टाकणाराय् .

राधाक्काः नि चालवणार कोण ? एक चालवताना ह्याचा पार खोका झालाय्'

संभूसः तो चालवणाराच म्हणे भास्करला विचारत होता ना.ह्याने त्याच्याशी बोलणं पण करून ठेवलंय् .

राधाक्काः म्हणजे हा मुडद्या त्या बिल्डराशीही बोलणी करत असेल.मला देवदत्ताला कळवायलाच हवं.

संभूसः लवकर काहीतरी करा.म्हणजे इस्टेट विकणार जरी असलात तरी तुमची फसवणूक तरी नको व्हायला.

राधाक्काः बघतेच आता मुडद्याला.येऊ तर दे घरी.'

संभूसः आत्ता लगेच कांही बोलू नका.नाहीतर तो भास्करवर संशय घेईल.तुम्ही आपलं थोरल्याला कळवून ठेवा.

..प्रभा हातात भांडं घेऊन परत करायला येते.तिने कांही ऐकलं कि काय अशा संशयाने तिच्याकडे पहात मग मामी आपल्या घरात जाते...

(प्रभाकडे बघत राधाक्का...)

राधाक्काः एवढी घाई काय होती भांडं परत करायची ? आता टेक जराशी बाकड्यावर. जेवलीस का धड ?

प्रभाः हो काकू. बाबा अर्धा दिवसांनी गेलेसुद्धा शाळेत.काम होतं म्हणून.परिक्षा आल्याहेत ना ? तुम्हाला मी काकू म्हटलेलं चालेल ना ?

राधाक्काः खुश्शाल म्हण काय वाटतंय ते.त्यात काय एवढं.मला तरी येतंय कोण काकू म्हणायला.तुझं पिठलं बाकी छान झालंवतं ग. एरव्ही नांवं ठेवत जेवणारा बाब्या दोन घास जास्तच जेवला.सारखं बाहेर खायची चटक लागलेली.

प्रभाः म्हंजे? जेवायला घरीच येतात ना ?

राधाक्काः केव्हांतरी लांबची सवारी मिळाली कि बाहेरच खावं लागतं.जाऊदे. तू चहा घेशील का थोडा ? पण थंड झाला असेल.माझ्याकडे ना गॅस ना स्टोव्ह. लाकडं मागे ओढून ठेवलीयेत.

प्रभाः पण मला नकोच आहे.मी घेत नाही दुपारचा.आणि मला आता करावाच लागेल, बाबा आले की.केव्हां येतील कोण जाणे.

राधाक्काः येतात ह्याच वेळेला.पण कधीकधी काय तो जादा क्लास का काय घेतात म्हणे. नि मग जातात त्या बुरकुल्यांच्या खानावळीत; हातात तुझी ती लोणच्याची बाटली घेऊन.(हंसते..)

प्रभाः घरी आईला तर सांगतात कि करतात हातांनी म्हणून.

राधाक्काः अगं ते सुट्टीच्या दिवशी.रोज कुठलं जमायला.त्या शिकवण्या का काय त्या घेत असतात ना.पगार पुरत नाही म्हणे; नि खासगी शाळातनं तो वेळेवर मिळतही नाही ना.

प्रभाः त्यात विभाची कॉलेजची फी नि काय काय.मी दहावी होऊन बसलेय घरी. मिळाल्या तर प्राथमिक शाळेतल्या मुलांच्या शिकवण्या घेते.पण तिकडे मिळत नाहीत

राधाक्काः  अगं मास्तर सांगत होते तू मेंदीबिंदी काढतेस.

प्रभाः ते काय खरं नाही हो.स्थळं आली तर सांगायला फक्त.ते विणकाम वगैरे सारखंच अजून एक. त्यात मिळत कांऽऽही नाही.

राधाक्काः (अंदाज घेत )आता जायचंय ना डोंबिवलीला का कुठे ते.होईल काहीतरी.

प्रभाः बाबा उगाच आशेवर आहेत.बिननोकरीची नि तीही वय वाढलेली मुलगी कोण पसंत करणार.नुसतं म्हणायला, म्हाता-या आईवडिलांचं करायसाठी नोकरी नको. पण मग हुंडा हवा.बाबा कुठनं आणणार एवढे पैसे; तेही दोघींसाठी ?

राधाक्काः जाऊन तर या उद्या.

प्रभाः बघूया. मी विचारायला आलेवते भाजीचं काय करता तुम्ही ? उद्यासाठी कायतरी आणायला हवी ना.बाबांना उशीर झाला तर ते कुठून आणणार ?

राधाक्काः मग ये कि घेऊन.इथेच समोर तर आहे पिंपळपार.गल्ली ओलांडल्यावर. संध्याकाळचे भाजीवाले बसतात तिथे.

प्रभा.एकटीने कशी जाऊ ? बाबा ओरडतील.

राधाक्काः अग एवढा लांबचा प्रवास करून आलीस ना एकटीनेच.मऽऽग ?

..एवढयात मास्तर गेटातनं आत शिरतात.हातात बंद लावलेली पिशवी..

मास्तरः ( समोर बघत ) काय गप्पा चालल्याहेत राधाक्का ? प्रभे ही भाजी घेऊन जा घरात.मी आलोच पाय धुवून.

राधाक्काः  मास्तर, तुम्ही कशाला आणत बसलात भाजी ? मी दाखवणारच होते तिला दुधाचा पार..आत्ताच विचारत होती. हो ना ग मुली ? उद्या ये माझ्याबरोबर सकाळी..

.. प्रभा जाते.मास्तरही ओटीपलिकडे पाय धुवून येतात नि ओटीवर बघत नमस्कार करून...

मास्तरः बाबूराव गेले वाटतं रिक्षा घेऊन ?

राधाक्काः गेलाय खरा.कोण जाणे किती लांब गेलाय.दुपारी मार खाऊन आलाय. म्हंजे असं दाखवत तरी होता.

मास्तरः मला कांही लक्षण बरं वाटत नाही त्यांचं.नको त्या लोकांमधे त्यांची उठबस

राधाक्काः का? तुमच्या कानावर आलंय का कांही ?

मास्तरः अगदी सरळ नाही पण ते खिडकयांखालचे खाऊगल्लीवाले बोलत असतात कायतरी.

राधाक्काः मीही विचारात पडलेय.हा खरंच मार खाऊन आला का बहाणे करतोय. मला देवदत्ताला कळवायलाच हवं.

मास्तरः बघा बुवा काय ते..चला उद्या पुन्हा अर्धा दिवस घेऊन यायला हवं.त्या डोंबिवलीला टिपण टाकलंवतं.ते जमलंय ना.जाऊन यायला हवं.फोन केलावता शाळेतनं तर त्याला म्हणे उद्या शुक्रवारीच रजा असते.कुठल्याशा डिपार्टमेन्ट स्टोर मधे आहे कॅशर म्हणून.आम्हाला ह्याहून काय मिळणार ? परवडणार तर नाहीच.

(प्रभा दाराशी येऊन ऐकत असते ती नि पाठोपाठ मास्तर घरात जातात.)

# वास्तुपुरुष

## अंक २ रा

अंधार नि उजेड ...(दोनतीन दिवसांनंतर )

वास्तुपुरूषः काय प्राक्तन आहे ह्या वास्तूचं हे मलाही नाही कळलं कधी.मी आत्मा आहे ह्या वास्तूचा.पण फक्त राखणदाराची भूमिका निभावतोय.मीही आता ह्या वास्तूसारखाच डळमळीत झालोय.केव्हां निरोप घ्यायला लागेल कोणास ठाऊक. मालक बेपत्ताच आहे आणि मालकिण त्याला शिव्या घालत का होईना त्याची वाट पहात दिवस ढकलतेय. बिचारी खोटया आशेवर जगतेय.अपरिहार्यता म्हणून ! पण तिची आशा; तिचा विश्वास खोटा तरी कसा म्हणायचा.वास्तूची किंवा माझी नसेल कदाचित पण आपल्या मुलांची काळजी आहेच ना तिला.विशेषतः धाकटयाची. कसाही मतलबीपणे वागला तरी त्याचा संसार मार्गी लागावा ह्या एकाच आशेवर बिचारी टिकून राह्यलीय.थकलीय तरीही.ती समोरची पोर जीव लावतेय. बघूया काय होतंय.पण एक नक्की कि ह्या बाईमुळेच ही वास्तू अजून टिकून आहे इथे. आणि म्हणूनच मीही ! त्या मोडक्या गेटाच्या दगडी खांबांसारखाच ..

..बाबू ओटीवर अस्वस्थ येरझा-या घालतोय.मधेच समोर बघतो.दाराशी प्रभा दिसते. बाबू पुन्हा बाकडयावर बसतो.भास्कर दारात चपला घालतांना बाबूकडे नि मास्तरांच्या दाराकडे बघून हंसतो. ..

भास्करः काय बाबूराव, आता तुमचा काय इरादा आहे ? धंद्यावर गेला नाहीत ते. लगता है तीर निशानेपे लगा है.

..राधाक्का हातात दूधभाताचं बुडकुलं नि दुस-यात जुनेराचं दुपटं घेऊन बडबडतच बाहेर येते...

राधाक्काः आता आधी माझ्या बाळंतिणीला दूधभात खाऊ घालते.पसरली असेल तशीच.पिल्लांना टाकून जाणार कुठे भूक भागवायला. नि त्या डोळे न उघडलेया बोटभर लिवलिवत्या जिवांना पांघरूणाही हंवंच... (समोर भास्करकडे बघत.. )

राधाक्काः निघालास का भास्करा चहा घेऊन ?
(भास्कर चपापतो.प्रभा पटकन दार लावते )

राधाक्काः आता हिला काय झालं ? (स्वतःशीच हंसते )

भास्करः का? काय झालं बाबूच्या आई ?

राधाक्का: भास्करा ऽऽ..माझे केस उन्हाने नाय पांढरे झाले ! हा बसलाय बघ पुतळा होऊन.बरं वाटत नाहीये का बाब्या ?
(बाबू लगेच बाकड्यावर आडवा )

राधाक्का: भास्करा, घेऊन जा ह्यालाही.चहा झाल्यावर.

भास्कर: माझा झाला राधाक्का, मी निघालो.

राधाक्का: बाब्याला आज सवारीला जायचं नाहीय वाटतं.जा बाब्या.ये जाऊन.बरं वाटेल. आता तर मावा खायलाही जात नाहीस.बरंच आहे म्हणा ते.

भास्कर: तेच विचारत होतो.बराय. सुधारतोय.(मास्तरांच्या दाराकडे बघतो )
निघतो मी.. (भास्कर जातो )

राधाक्का: बाब्या, सकाळी सवारी नाही मिळाली म्हणून पारावरनं माघारी फिरलास. सकाळपास्नं घरातच बसलाहेस तो ये कि जाऊन.गिळून झाल्यावर झोपू नये असं सुस्तावल्यागत.लक्ष्मी माघारी वळते अशाने.

.. समोर प्रभा दाराशी येते नि राधाक्काचा आवाज ऐकून परत दार लावते..

राधाक्का: एक गेलीच आहे परत. कोणास ठाऊक लक्ष्मी होती कि अवदसा.
(बाबू दचकून तिच्याकडे बघतो )

राधाक्का: सुंद्री व्यायली बहुतेक.बारिक बारिक आवाज येताहेत पिलांचे.बघून येते.
..राधाक्का समोर बघत मागे जायला उजव्या विंगेत जाते.बाबू ओटीच्या खांबाजवळ येऊन समोर बघत खाणाखुणा करतो नि दाराआडची प्रभा उजव्या विंगेकडे नि मामींच्या दाराकडे बघत पायरीजवळ येते..

बाबू: किती वेळ वाट पहायला लावलीस सकाळी पिंपळपारावरच्या दूधअड्ड्यावर !

प्रभा: मला वाटलं तुम्ही स्टेशनला जाता सकाळी.

बाबू: ते नंतर.आधी तुला नेणार होतो फिरायला.

प्रभा: सकाळी आणि फिरायला ? ( हंसते )

बाबूः  त्यात काय झालं.देवळापोतर गेलो असतो..देवदर्शनाला..( हंसतो )

प्रभाः  पारोशाने ? आणि बाबा असतात घरात.त्यांचा डबा नको द्यायला.त्यातून मामींची घारीची नजर.खिडकीतनं हांका मारायच्या उगाच..आणि राधाक्का ?

बाबूः  ती केव्हांच दूध घेऊन येते, उजाडायच्या आधीच. आता कुठे भेटणार बोल ! तुला तर कल्याणातली कांहीच माहिती नाहीये.

प्रभाः असे कितीसे दिवस झालेत येऊन ?

बाबूः मग भेट तिथेच.

प्रभाः  संध्याकाळी तिथेच? पिंपळपारावर ; भाजी आणायला. पण तिथे तुम्हाला ओळखणारी लोकं असतील ना !

बाबूः असू देत. दोस्त आहेत आपले.

प्रभाः  मावा खाणारे ?

बाबूः  आता खात नाही मी मावा. आईच्या पण लक्षात आलंय ते.तू ये तिथे.मग..

प्रभाः मग काय ?

बाबूः  काय नाही.घाबरू नको.मी कांही करणार नाही तुला (हंसतो) तिथून मग पुढे जाऊ, स्टेशनपोतर.

प्रभाः  बापरे.एवढया लांब.बाबा येतील ना.

बाबूः  नाही.त्यांचा क्लास आहे संध्याकाळी.भास्कर सांगत होता.

प्रभाः  तुम्हाला सगळी माहिती असते !

बाबूः  ठेवावी लागते.

प्रभाः तरी स्टेशनला नको.देवळापर्यंत जाऊन येऊ.राधाक्कांना घेऊन जात होतात ना ; तिथपर्यंत.

बाबूः आईने सगळं सांगितलं वाटतं तुला? हे तुझं भोकराचं लोणचं कामाला येतंय!

प्रभाः (राधाक्कांची चाहूल घेत) राधाक्का आल्या वाटतं.

बाबूः मग भेट संध्याकाळी..

.. ती पटकन वळते.बाबू बाकड्यावर आडवा होतो.राधाक्का स्वतःशीच बडबडत येते. ..

राधाक्काः तुम्हाला सांगते मामी; मी सुंद्रीचं पोट बघूनच भाकित केलं होतं. (समोर मास्तरांचं अर्धवट उघडं द्वार बघून स्वतःशीच हंसते ) ऐकताय का मामी.मला चारचार नातवंडं झालीयेत..

संभूसः ( द्वाराशी येत ) मला कांही म्हणालात का राधाक्का ?

राधाक्काः म्हंजे ऐकलं नाहीतच का? तुम्ही तिकडे बाहेरच्या खिडकीशी सदान्‌कदा बाब्या म्हणतो ते वॉच का काय ते ठेवायला.तुम्हाला कसं ऐकू येणार ?

संभूसः काय झालं ?

राधाक्काः अहो, मला चारचार नातवंडं झालीयेत.

संभूसः राधाक्का, तुम्हाला आता भ्रम झालाय.तुमची नातवंडं इकडे कुठली यायला ! वाड्यात तर अजून एकही नाही.

राधाक्काः येतील , ती पण येतील. ( मास्तरांच्या द्वाराकडे पहाते ) आत्ता आधी माझ्या सुंद्रीला चार पिल्लं झालीयेत मी म्हटलं नव्हतं तुम्हाला !

संभूसः (मान वेळावत ) धन्य आहे राधाक्का तुमची.

..मामी आत जाते.राधाक्का स्वतःशीच बडबडत ओटीची पायरी चढते. ..

राधाक्काः ( स्वतःशीच ) आता आधी ह्या बयेला खायला घालायला हवं.ते ओशट बिशट तर ती बाहेर जाईल तेव्हांच शेजारच्या बिल्डिंगीमधून.मी आपली खिमटी घालीन करून.दूध यायला हवं ना पिल्लांना ..

..बाबू ती आत जातांना आपल्या दाराकडे बघत कपाळावर हात मारतो नि परत आडवा होतो..

अंधार नि उजेड... ( दुपारनंतरचा ) ..

दुपार उलटल्यावर उजेडासाठी राधाक्का ओटीच्या पायरीवर एक पाय खाली सोडून हातात बाबूच्या युनिफॉर्मचा कोट घेऊन बटन लावायला बसलेली.सूई ओवायला दिसत नाही.एवढयात हातात पिशवी घेतलेली प्रभा दाराला कुलूप  लावण्याठी वळते तेव्हां तिचं लक्ष समोर जातं.मग तिला राधाक्कांकडे यावंच लागतं...

प्रभाः वाडयात एवढा शुकशुकाट कसा राधाक्का ?

राधाक्काः आहेत कोण माणसं ? इन मिन तीन बि-हाडं.मागच्या बि-हाडातला येऊन जाऊन असतो; तुझ्या बाबांसारखाच..नि मामी गेल्याहेत पिंपळपारावर भाजी आणायला.तू पण निघाल्येस कि काय ?

प्रभाः  हो म्हंजे जाणार होते.पण...

राधाक्काः मग मामींसोबत जायचंस कि शोधावं  लागलं नसतं .. .

प्रभाः त्याना सांगायला विसरले.माझं नक्की नव्हतं ना.

राधाक्काः मग आता जा..समोरच्या बोळातनं गेलं कि दिसेलच.

प्रभाः  नको.जाईन जराशाने.मामी येऊं देत.तुम्ही एकटयाच आहात ना.

राधाक्काः माझी नको काळजी करू.मला संवय आहे.

प्रभाः हे काय शिवताय ?

राधाक्काः (चष्म्याची काडी कानावर अडकवत ) ह्या गाढवानी नाटक केलं ना परवा मार खाऊन येण्याचं.बटणं तोडून ठेवलीयेन कोटाची.जरा ओवून दे बाई ही सुई.

प्रभाः (सुईदोरा घेऊन ओवून देते) द्या मी लावते.पण हे नाटक का काय म्हणता ते कसलं आणि ? मारामारी झाली ना कुठेशी ? बाबा म्हणत होते.

राधाक्काः तेच नाटक.जाऊ दे.तुझे बाबा आणखी काय म्हणाले ?

प्रभाः कांही नाही. ( एक सुस्कारा सोडते )

राधाक्काः मग जा, जरा जाऊन ये पिंपळपारावरनं . बरं वाटेल. (प्रभा चमकते) म्हंजे भाजी घेऊन ये..मला पण आण एखादी .मामीना सांगायला विसरले..

प्रभाः जाणार होते..पण नाही जावंसं वाटत आता.

राधाक्काः का ग ?

प्रभाः बाबा सांगत होते कि त्यांनी तिकडे आईला फोन केला म्हणे शाळेतनं कि ते मला बसवून देणारेत. बहुतेक रविवारच्या गाडीला; तिकीट मिळालं तर.

राधाक्काः कां ग ? तिकडून काय नकार आला का?

प्रभाः स्पष्ट नाही.पण बहुतेक तसंच असावं. अजूनसुद्धा एक स्थळ होतं म्हणे. पण आता मलाच नकोय ते तसलं दाखवून घेणं.

राधाक्काः आणि न दाखवता कोण पसंत करील ? अग रीत आहे तशी.अशी निराश नको होऊस बाई.प्राक्तन असतं एकेकाचं.त्या पोराचं नसेल. (सूचकपणे ) हां. आता तूच कोणाला पसंत केलं असलस तऽऽर !

..प्रभा चमकून बघते नि खाली मान घालून..

प्रभाः पण तसलं कांही बाबांना आवडायचं नाही. होईल काय व्हायचं ते.

राधाक्काः (राधाक्का हंसते ) खरंच.व्हायचं ते होईलच.नको काळजी करूस..

प्रभाः मी सांगीन बाबांना.

राधाक्काः (चमकून ) काय ?

प्रभाः हे असलं; माहिती नसलेल्या ठिकाणी मी नाही जायची ह्यापुढे.

राधाक्काः खरंय बाई.नशीबात असेल ते समोर येईलच.ओळखदेख नसलेल्या कोणी पसंत केलं म्हणून तरी काय वेगळं होणारेय. मी नाही आले इथे. माझं प्राक्तन इथे होतं , अगदी गेटापास्नं पायघड्यांवरनं आणली सासूने घरात. पण पुढे व्हायचं ते काही चुकलं नाहीच.गेली बावीस वर्ष एकटीनेच काढली.

प्रभाः म्हंजे तुमचे हे उद्धवराव लहान असतांनाच गेले ?

राधाक्काः बाब्या चांगला तेरा वर्षाचा होता.बाप आठवतोय त्याला.आणि हे गेले म्हंजे घर सोडून गेले.खपले नाहीत.गळयात पोत आहे अजून.कपाळावर चिरी लावते त्याच्या नांवाने.येईल केव्हांतरी म्हणून वाट बघतेय.

प्रभाः म्हंजे ? ते कुठे गेले ते कळलंच नाही ?

राधाक्काः अग बये, यात्रेला म्हणून गेलाय बाब्याचा बाप.आपल्या बापाला सांगून.

प्रभाः (गोंधळलेल्या चेह-याने ) बापाला ? म्हंजे ?

राधाक्काः म्हंजे बाब्याच्या आज्जाला.जाऊं दे. तुला नाही कळायचं.मी असंच बोलते. उद्धवला बाब्या ़नि त्याच्या बापाचाही मी एकेरी उल्लेखच करतेय.कोणास ठाऊक आहे तरी का !

प्रभाः: (शहारल्यासारखं करत) असं नका हो म्हणू. कोण जाणे ; येतीलही केव्हांतरी !

राधाक्काः त्याचीच तर वाट पहात दिवस काढतेय मी.आला तर बरंच आहे.म्हंजे मी मरायला मोकळी , भरल्या कपाळांनी.आता तेवढीच अपेक्षा करायची.ह्या घरात आले तेव्हां मलाच काय आईबापालासुद्धा वाटलं होतं कि भाग्य फळफळलं माझं. पण कसलं काय नि फाटक्यात पाय.

प्रभाः असं का बोलताय ? संसार झालाच कि !

राधाक्काः हा असला पांगळा संसार ? सासूला हौस म्हणून सून घरात आली . चार दिवस कोडकौतुकाचे वाटयाला आले.

*** ***

..ती ट्रान्समधे गेल्यासारखी एकटीच स्वगत बोलत रहाते.अधांतरी बघत.मंचावर अंधार.फक्त तिच्या चेह-यावर फोकस. ..

राधाक्काः म्हटलं ना तुला ? तसा चार दिवस चौघडा झडत होता तिथे पारावर ( चौघडयाचा आवाज ) वरात आली; तीही घरच्या सजवलेल्या बग्गीतनं.पाठीपुढे मोराच्या गॅसबत्त्या.पुढे तो काय म्हणतात तो ब्रासबॅन्ड .(बॅन्डचा आवाज ) पायघडयांवरनं पितांबरी नेसून सासूचा शेला पांघरलेली; नथबुगडया ल्यालेली शिरढोणाच्या हेरंब जोशांची लहानखुरी मनोरमा धुंडिराजबुवा पुराणिकांची सून होऊन आली; माप ओलांडून.चार दाणे ह्याच पाय-यांवर सांडले तशी सासू म्हणाली; बरंय..आला गेला पैपाव्हणा जेवणार तुझ्या हातचं. इथेच ओटीवर लक्ष्मीपूजन झालं नि विश्वनाथ पुराणिकांनी नांव ठेवलं राधा..पुढे सगळया गांवाची राधाक्का झाली.

(समोर माडीच्या खिडक्यातून प्रकाश येतो..)

दुस-या दिवशी पूजा झाल्यावर गांवातल्या खाशांना पानसुपारी होती; वर समोरच्या माडीवर.गॅसबत्त्या लावून झालेलं बुवांचं किर्तनही रंगात आलं होतं.

( पार्श्वभागी पेटीचे सूर.बुवांचा आवाज.. 'जय जय रामकृष्ण हरी )

बुवा तालासुरात भजन म्हणत होते. गळा गोऽऽऽड होता बुवांचा. सगळा सोहळा कसा दृष्ट लागावी असा पार पडला. लागलीच दृष्ट... .

..हळूहळू माडीचे दिवे जातात नि नेहमीचा तिन्हीसांजेचा प्रकाश पडतो..

संभूस मामी गेटातनं आत येऊन पायरीवर पिशवी ठेवते नि ओटीपलिकडच्या नळावर पाय धुतल्यासारखं करून राधाक्कांच्या पुढयात पायरीवर बसते.त्या दोघी अजून ट्रान्समधेच.समोरच्या माडीकडे बघत.

संभूसः अशा का बसलाहात तुम्ही दोघी ? आणि तिन्हीसांजा व्हायला आल्या.दिवे कधी लावणार ?

राधाक्काः ( अजूनही त्याच तंद्रीत ) ते काय लागलेत; माझ्या नशीबाचे.समोर माडीवर !

संभूसः माडीवर ? बंद खिडक्यातून दिसले तुम्हा

..प्रभा खडबडून जागी झाल्यासारखी..माडीकडे बघत हातातला कोट राधाक्कांच्या हातात देत ..

प्रभाः मी तरी काय ऐकत बसलेय ! बाबा यायला झालेत. (असं म्हणत पायरी उतरून उभी रहाते )

संभूसः काय बघत काय होतात वर ? दिवसा स्वप्न पडायला लागली का काय ?

राधाक्काः जाग आल्यासारखी.. काय नाही हो.माझ्या नशीबाचे दिवे लागले तिथे, त्याच माडीवर जिथे बुवांचं कीर्तन रंगलं होतं.जाऊदे.. .कायकाय मिळाली भाजी ?

संभूसः फार नाय हो कांही.महाग आहे सगळं.शिराळी होती कावडवाल्याकडे. आणि भूईमुगाच्या शेंगा आणल्या भास्करसाठी.त्याला आवडतात ना.उकडीन म्हणते उद्याकडे.

राधाक्काः ह्या पोरीला पण द्या थोडया.

प्रभाः नको राधाक्का.आमच्याकडे असतात तिकडे. .

..ती वळणार तोच युनिफॉर्म मधले दोन रिक्षावाले; पायाला प्लास्टर घातलेल्या बाबूला दोन्हीकडे धरून गेटात शिरतात.तिघी सुन्न होऊन

बघतच रहातात..त्यातला ओळखीचा वाटावा असा बहुतेक गांवातलाच रिक्षावाला बोलतो. ..

१ला इसमः बाय , तुज्या बाबूला चेपला कोनीतरी लांब न्हेवन.'

२रा इसम ः हां अम्मा, क्या पता कौन दुश्मन था.

१ला इसमः हां.बरा तं बरा.तेना कोनला फोन कराया सांगलान आमाला न मंग गेलीलाव आमी.'

राधाक्काः (कण्हत पुढे आलेल्या बाबूच्या दंडाला धरून )काय रे हे एकेक अरिष्ट !

..स्वतःच्याही नकळत पुढे होऊन प्रभा दुस-या दंडाला धरते.
..ते दोघं 'खयाल रखना भाय.' असं बोलून जायला वळतात.

बाबूः (मागे वळून त्यांना ) हां बन्सी.शुक्रिया भाय.लेकिन मेरी रिक्षाको वहांसे उठाना .'

२रा इसमः फिकर मत करो.हम देखेंगे.'

राधाक्काः (पूर्ण भानावर येत ) आता हे तरी खरं का मेल्या ?

..बाबू राधाक्कांकडे रागाने बघतो. ..

संभूसः राधाक्का प्लाश्टर दिसतंयच कि !

प्रभाः हे कायतरी वेगळंच दिसतंय राधाक्का.कोणाचं तरी कारस्थान.जीव वाचला हेच खूप. चुकलंच माझं.मी जायला हवं होतं पिंपळपारावर.

..बाबू चमकून प्रभाकडे बघतो ..

संभूसः कशाला ?

प्रभाः भाजीला; तुमच्याबरोबर. आता अंधार पडेल ना !

..बिनचष्म्याचा बाबू तिच्याकडे पहातो.एवढयात गेटातनं मास्तर येतात.प्रभा हात सोडते नि तोच धरून मास्तर बाबूला ओटीवरच्या बाकडयावर बसवतात...

मास्तरः हे आणि काय झालं आता ? काय हो राधाक्का ? बाबूराव, कपाळावरही जखम दिसतीय.कोणी गाठून मारलंबिरलं कि काय ?

बाबूः (उसळून ) मारील कशाला कोण ? त्यांची हिम्मत आहे का मारायला.आणि माझी काय दुश्मनी नाय कोणाशी.

राधाक्काः मग ते लोकं चेपला काय म्हणाले ?

बाबूः त्यांना संशय आहे.कोणीतरी सुपारी दिली असेल.म्हंजे मलाही तसंच वाटायला लागलंय.

संभूसः तू तर म्हणतोयस कि तुझी दुष्मनी नाहीये मग हे कोण लोकं असतील ?

राधाक्काः तुझे ते परवाचे बिल्डरचे लोक नव्हेत ना..
बाबूः ते नाही माहित पण सवारी आधी वेगळं ठिकाण सांगून मग लांब घेऊन गेली.पार भिवंडीच्या रस्त्याला. नि बरोब्बर सवारी उतरून गेल्यावरच टेम्पोची धडक बसली.

मास्तरः तुम्हाला कोणी धमकी वगैरे दिली होती का ? तर आपण पोलिसात तक्रार करू शकतो.

बाबूः अशी कोणी डायरेक्ट धमकी देणार नाय.हे बिल्डर लोक पोचलेले आहेत.

राधाक्काः म्हंजे मेल्या; तू करायला गेलास तेच तुझ्या अंगाशी आलं !

बाबूः म्हंजे ?

राधाक्काः म्हंजे मला घाबरवायसाठी नाटक केलंस ना परवा.तेच ते लोकं खरं करायला बघताहेत.भास्कर म्हणाला तेच खरं..

बाबूः काय म्हणाला भास्कर ?

राधाक्काः मीच त्याला सांगितलं होतं लक्ष ठेवायला.ते खाऊगल्लीतले मित्र आहेत ना तुझे. त्यांच्यावर.मेल्या आयशीला फसवायला गेलास नि जिवाशी खेळ करून बसलास.ते कांही नाही.मास्तर तुम्ही दत्तूला तारच करा आता. फोनला तो दाद देत नाहीचाहे..

मास्तरः नाही म्हंजे त्यांनी ऐकून घेतलयं सगळं.येतीलही कदाचित उद्याकडे !

बाबूः म्हंजे तू दादाला कळवलं होतंस ?

राधाक्काः मग काय करणार ? (मास्तरांकडे बघत ) तुझं एकदा मार्गी लागलं कि मीही जाईन म्हणते काशीयात्रेला.

संभूसः राधाक्का कळवाच तुम्ही.

मास्तरः (त्यांच्याकडे बघत ) ह्या गोष्टी घाईने करायच्या नसतात मामी.

राधाक्काः तरी तुम्ही तार कराच.म्हंजे तरी येईल मला खांदा द्यायला.म्हणावं म्हातारी मरायला घातलीय त्याच्या आधी काय ती विल्हेवाट लावा एकदाची.मी किती दिवस बाब्याची काळजी करत बसणार ?

संभूसः आमची काळजी घ्या म्हंजे झालं.

राधाक्काः तुम्हाला तेवढीच काळजी ! म्हणून चहा पाजता वाटतं कधीतरी ?

संभूसः काय हे बोलणं राधाक्का..

राधाक्काः तर काय.सारे आपापल्या मतलबाचे.हा बाब्याही काय कमी नाहीय. त्यालाही लोभ सुटलाय.खरंच सुटेन एकदा मेले कि.

मास्तरः असं तिन्हीसांजेला म्हणू नये राधाक्का.वास्तूपुरूष तथास्तु म्हणायला गाठ पडली तर !

प्रभाः आणि आम्ही आहोत ना. (चपापते )

राधाक्काः काय खरं नाय ते.तूही जाशील निघून.

प्रभाः म्हंजे हे सगळे आहेत ना. बाबूरावना आधार द्यायला. (बाबू तिच्याकडे बघतो)

राधाक्काः मास्तर तुम्ही तार कराच.

संभूसः तुम्ही आधी शांत व्हा.नि बाबूच्या जेवणाखाणाचं बघा.

प्रभाः मी आणते पोळीभाजी.आहे दुपारची.

.. तिच्याकडे बघत संभूसमामी मान वेळावते.राधाक्का गालात हसते.बाबू नि मास्तर प्रभाकडे पहात रहातात. ..

पुन्हा अंधार .. ( दोन दिवसांनंतर )

..फक्त गेटातनं येणारी रस्त्यावरच्या लाईटच्या पिवळया प्रकाशाची तिरीप. अर्धवट अंधारात गेटातनं आत येणारी माणसाची आकृति ओटीवरच्या बाकडयावर डोकावते तोच बाहेरचा कुत्रयांचा गोंगाट ऐकून अचानक राधाक्का दार उघडते.तो माणूस डाव्या विंगेत पाठमागे जातो. ..

..बाबू बाकडयावर उठून बसलेला.राधाक्का जवळ जाऊन..

राधाक्काः झोप येत नाहिये् कां रे ?'

..त्याच्या कपाळाला हात लावून पहाते.तिच्या हाताला गार लागतं.बाबू घामाघूम झालेला तिला कळतं.काळजीच्या सुरात ती म्हणते ...

राधाक्काः केवढा रे हा घाम आलाय्.दचकून बिचकून नाही ना उठलास ? का स्वप्नबिप्नं पडलं ?'

बाबूः हो.स्वप्नच असावं बहुतेक.तो आला होता स्वप्नात.'

राधाक्काः कोण दिसलं स्वप्नात ?'

बाबूः तोच.तू ज्याची वाट पहातेयस् तो.मला लहान सोडून गेलेला माझा बाप.'

राधाक्काः तू जागा हो आधी.तो कुठला यायला आत्ता ह्या वेळी.'

बाबूः  कां ? तू तर वाटच बघत होतीस ना त्याची ?'

राधाक्काः कांही कोणी येत नाहीय्.झोप तू निवांत.नि आलाच तर मी आहे ना जागी.'

..त्याला पांघरूण घालते नि स्वतः खांबाला टेकून बसते.हळूहळू डोळे मिटायला लागतात नि ती डुलक्या घेते.रस्त्यावरच्या पिवळसर उजेडाची तिरीप. समोरची दोन्ही दारं बंदच.गेटाबाहेर रिक्षाच्या आडोशाला कुणाची तरी चुळबूळ.  ..

..राधाक्काला स्वप्नातली जाग येते.गेटाच्या बोगद्यातून बाहेर बघता बघता तिचं लक्ष गेटाच्या वर बरीच बर्ष बंद असलेल्या माडीकडे जातं. ..

राधाक्काला  दिवे लागल्याचा भास.गॅसबत्त्यांचा उजेड नि त्या उजेडात बुवांचं किर्तन रंगलंय् असं वाटतं. .. ..

(पार्श्वभागी किर्तनाचा, झांज-चिपळयांचा आवाज.)

..रंगीत रूमालाचा फेटा बांधलेले नि छपरी मिशा असलेले बुवा अगदी समोरच येऊन उभे रहातात..तोच वास्तूपुरूष ! फक्त पगडीऐवजी डोक्याला बुवांसारखा जरीचा रूमाल.ती पदर सारखा करीत झट्कन् उठायला जाते. बुवाच तिला म्हणतात..

पुराणिकबुवाः काय वाट बघत बसलीयेस वाटतं केशवाची ?'

राधाक्काः  हो.ते येतीलच ना केव्हांतरी.शेवटी अंग टाकायला आपलंच घर बरं.'

..  बुवा नुसते मिशीत हंसतात. ..

बुवाः तो कसला येतोय् आता ! तो पोहोचलासुद्धा असेल एव्हाना मुक्कामाला.'

राधाक्काः असं बोलवतं तरी कसं म्हणते मी.ते येणारच.म्हणून तर मी लेणीसुद्धा उतरवली नाहियेत् !

बुवाः त्यानी काय होतंय्.मनात एकदा संशयपिशाच्च शिरलं की ती लेणी काय त्याला बोलावून आणणारेत ?'

राधाक्काः संशय कसला ? यात्रेलाच तर गेलेत.रस्ता चुकले असतील तरी येतीलच केव्हांतरी.थोरल्याची काळजी नाहीय् त्याना.पण बाबूसाठीतरी येतीलच.

बुवाः तोच तर संशय आहे त्याच्या मनात.दत्तूच्या पाठीवर सतरा वर्षांनी बाबू झाला तेव्हांपासून केशव तुझ्याशी कसा वागला ते आठव.

राधाक्काः म्हणजे ? आपल्याच मुलाबद्दल संशय ? नि मग आधी सासूबाई औषधं कशाला देत होत्या मला? त्या गेल्यावर तुमच्या दिवटयानी पराक्रम केला त्याला मी काय करू ? आले की जाबच विचारते त्याना.

बुवाः तो तू तेव्हांच विचारायला पाहिजे होतास त्याला.आता वेळ गेली.त्याला कधी उपरती झालीच असती तर आला नसता कां एव्हाना? नि मुलांना काय सांगणारेस? थोरला तर तुझ्या वा-याला थांबत नाहीय्. म्हणूनच तर हॉस्टेलात गेला ना.

राधाक्काः हे काय तुम्ही एकेक नवीनच सांगताय् आता.तुम्हीच तर पाठवलात ना.'

बुवाः माझ्या माघारी डेस्कातनं काय काय महत्वाचे कागद घेऊन गेला ते पाह्यला हवे होतेस.

राधाक्काः महत्वाचे म्हंजे जमिनींचे कागद ना ? ते मी बरी त्याच्या हाती देईन. दुसरी तुमची बाडं तर तो त्याच्या संशोधन का काय त्या कामासाठी घेऊन गेला.

बुवाः ते तुला सांगायला !

राधाक्काः मग दुसरं काय होतं त्यात ?

बुवाः यात्रेला जाण्याआधी केशवाने मला नि त्याला दोघानाही पत्र लिहून ठेवली होती. देवदत्ताचं पत्र मी दाबून ठेवलं होतं ते त्याच्या हाती नंतर लागलंच.'

राधाक्काः म्हणजे दत्तूलाही बापाने पढवून ठेवलं होतं की काय ? येऊनच दे मेल्याला.चांगला खडसावतेच त्याला. बावीसावर वर्ष होऊन गेली त्याना जाऊन. कधी वाकडं नाही वागले मी.नि हा कालचा पोर आयशीचा संशय घेतोय्.नि तोही नाकर्त्या बापाच्या सांगण्यावरून.

बुवाः तू हारलीस राधे.उगाच वाट पहात राहयलीस केशवाची.'

राधाक्काः मग काय करणार होते मी दुसरं.'

बुवाः कां? तूही यात्रेला निघून जायचंस. अजूनही जा तो आला तरी.

राधाक्काः नि मग हया दिवटयाला कोण पाहिल ? संसार मोडलाच आहे त्याचा.

बुवाः त्याला तरी कुठे तुझी पर्वा आहे ? काय काय कारस्थानं करीत असतो इस्टेटीसाठी.बघतेय्स ना ?

राधाक्काः ते कांही असलं तरी मी कांही इथनं हलायची नाही.ते येतीलच.त्याना जाब विचारणारच आहे चांगला.

बुवाः त्याचा कांही उपयोग नाही आता.तुझी बावीस वर्ष फुकटच गेली.त्याला नाहीच नि मुलांनाही तुझी पर्वा नाहीय् . .. श्रीहरी श्रीहरी .. ..'

बुवा एकदम अंतर्धान पावतात.एखादा झगमगीत उजेडाचा झोत डोळे दिपवून विझून जावा तसे. .. आणि अर्धवट झोपेत असल्यागत राधाक्का बसल्याजागीच बडबडायला लागते.

राधाक्काः मेले माझ्यावर संशय घेताहेत.हिम्मत कशी झाली ह्यांची म्हणते मी.नि बुवा तुम्ही तरी कां नाही तोंड उघडून सांगितलंत त्याना.गप्प राहून तुम्हीसुद्धा माझी मजाच बघितलीत काय ? कां तर माझं पोर माझ्यासारखं वेडंबागडं आहे म्हणून ? माझी मी समर्थ आहे त्याला संभाळायला. आता नकाच येऊ म्हणावं परत.

..तिच्या ह्या असंबद्ध बडबडण्याने बाबूलाही जाग येते. भ्रमात असल्यागत राधाक्का हातवारेही करायला लागते तसा बाबूही लंगडत तिच्याजवळ येतो नि तिचे हात धरून तिला सावध करायला लागतो.. ..

बाबूः अगं अगं. काय बडबडतेय्‌स्‌ हे सगळं.माझ्याऐवजी तुला दिसला कां तो ?

.. राधाक्का खरंच जागी होऊन भोवताली बघायला लागते; भ्रमिष्ट झाल्या सारखी. तिला भान येतं नि स्वप्नात आपण बुवांशी बोलत होतो हे आठवतं. ..

राधाक्काः तो नाही ; त्याचा बाप आला होता मला सांगायला.काय तर म्हणे तू त्याचा मुलगा नाहीस असं वाटतंय्‌ त्याला म्हणून गेला तो.नि बुवांसारखा लोकाना ब्रम्हज्ञान शिकवणारा माणूस गप्प बसला हे ऐकून ! कर्म माझं नि काय.'

..बोलता बोलता तिचं लक्ष समोर जातं.तिथे रात्री कोणीतरी खुडबुडत असल्याचं तिला आठवतं.एक दाढी वाढलेला वेडसर दिसणारा नि अनोळखी इसम तिथे पाराजवळ उभा राहून तिच्याच हातवा-यांकडे पहात असतो. ..

राधाक्काः तो बघ कसा चोरासारखा येऊन उभा आहे तिथे.

..बाबू पहातो. एक माणूस तिथे उभा राहून पहात असल्याचं दिसतं.त्याला आठवतं की रात्री स्वप्नात त्याला बाप दिसला होता. ..

बाबूः ( स्वतःशीच ) ते स्वप्नं होतं की हे ? हा खरोखरच येऊन माझ्यापुढे उभा राह्यला कि काय ?

..तो चक्रावतो.आधी आईला सावध करावं कां त्याला धरावं ह्या विचारात उठून तिला धरतो तोच राधाक्का पिसाळल्यासारखी मोठमोठयाने हातवारे करून बडबडायला लागते.एव्हाना उजेड पडायला लागतो नि समोरची दारं उघडून शेजारी बघायला लागतात.

राधाक्काः आता कशाला आलायस तोंड दाखवायला मरायला टेकल्यावर ? बावीस वर्ष वाट पहायला लावलीस.तुझ्या नांवाचं कुंकू लावत होते म्हणून राह्यले इथे तुझी वाट पहात.गेले नाही दुसरा धगड करून.संभाळलं मी माझ्या पोराला.कांही गरज नाही तुझी आता.

..ती बाबूला आवरत नाही तशी प्रभा पुढे होऊन तिला धरते. ..

प्रभाः राधाक्का , सावध व्हा. सावध व्हा राधाक्का.

राधाक्काः (हिस्टेरिक झाल्यासारखी ) चालता हो मुड्या आता आलास तसा.नि जाताना हे तुझं लेणंही घेऊन जा.गरज नाही मला त्याची ! !

..बाबूला कांही समजायच्या आत राधाक्का गळयाशी हात नेऊन कचकन् पोत तोडून त्या वेडयाकडे भिरकावते.ती त्या पाराजवळ पडते.तो वेडा ती उचलून घेतो तोच बाबू भान येऊन ओरडतो. ..

बाबूः 'अगं, अगं काय केलंस हे?कोण कुठला इसम.हा माझा बाप कसा असेल ? तो बघ ते घेऊन चालला.

..तो इसम अपराधी चेह-याने जायला वळणार तोच बाबू ओरडतो.

बाबूः 'अरे.धरा; धरा त्याला कुणीतरी.

..देवदत्त गेटात शिरत असतांना.त्याच्या लक्षात हा तमाशा येतो नि तो त्या इसमाला पाठीमागून धरतो.तो वळलेला बघताच देवदत्त त्याला ओळखतो नि चित्कारतो. ..

देवदत्तः अप्पा तुम्ही ? आणि काय ही अवस्था करून घेतलीयत्.

..सगळी लोकं बघतच राहतात.अगदी बाबूसुद्धा.म्हणजे राधाक्काचा विश्वास खरा ठरतो. पण आता राधाक्काने भ्रमात का होईना ,त्याचं अस्तित्वच नाकारलेलं असतं.म्हणजे स्वतःपासून तोडून फेकून देऊन ! कधीकाळी त्याने तिला असंच नाकारलेलं असतं ; संशयाने !

..दोघं बापलेक एकमेकांकडे नि मग राधाक्काकडे बघतच रहातात.बाबू केविलवाणा होऊन आईला समजावित रहातो.राधाक्का अजूनही बडबडतच असते.

राधाक्काः तुम्ही दोघा बापलेकानी मला अगदी वाळीत टाकलीत तरी कांही बोलले नाही मी.पण आता अगदी कडेलोट झाला.माझा संशय घेता रांडेच्यानो.कुठे फेडाल हे पाप ? बाबू तू नि मी जाऊया कुठेतरी.नाहीतर निदान मला तरी बसवून दे गाडीत.जाईन बापडी वाट नेईल तिकडे.नाहीतर महायात्रेलाच जाते कशी.

प्रभाः असं नका म्हणू राधाक्का..मग ह्यांचं कसं होईल ?

.. बाबू चमकून तिच्याकडे बघतो..

राधाक्काः हा आलाय ना मोठी यात्रा करून.मावंदं घाला त्याचं.मी चालले.

प्रभाः ..जरा जोरात..तुम्ही कुठेही जाणार नाही आहात.

राधाक्काः नाही कसं ? आता माझी पाळी. नाहीतरी आत्ताच बुवा सांगून गेलेत् सगळं.म्हणाले की आता तो आला तरी थांबू नकोस.जा निघून यात्रेला.

..देवदत्तालाही मग तिची दया येते.अपराधी भावनेने मग दोघंही तिच्याजवळ जाणार हे जाणून ती किंचाळते. ..

राधाक्काः दूर व्हा चांडाळानो.तुम्ही मोठे सोज्वळ आहात ना.विटाळाल मला हात लावून.बाबू आता तूच मला अग्नि दे.तूच माझा मुलगा.पाठव एकदाची महायात्रेला तुलाही इस्टेट हवीच आहे ना; ती मिळेल.सोडा मला.आता माझी यात्रा सुरू .

..प्रभा मास्तरांना हाक मारते..

प्रभाः बाबा, ह्यांना धरा.

..मास्तर नि भास्कर बाबूला दोन बाजूने धरून बाकड्यावर बसवतात. प्रभा राधाक्कांच्या हाताला धरून उठवते नि भिंतीजवळ बसवते.राधाक्का सोडवून घ्यायचा प्रयत्न करते.ती भान नसल्यासारखीच..

राधाक्काः अगं थांब बये.एवढयात नाही जात मी महायात्रेला.माझ्या सुंद्रीचं बाळंतपण करायचंय.चारचार नातवंडं झालीयेत मला.दुसरं कोणी न विचारू दे. ह्या घराची रीतच आहे ती.

( देवदत्त नि अप्पा एकमेकांकडे पहातात..)

प्रभाः राधाक्का भानावर या.कोणी न विचारू दे.मी विचारीन तुम्हाला.आणि ह्या घराची रीत मी मोडीन. आता ह्या घरात पुन्हा कोणी राधाक्का होऊ देणार नाही !

..भरल्या डोळयांनी बाबू बसल्या जागी मान डोलवतो.मामी नि मास्तरांचा पुतळा झालेला.हळूहळू दिशा फाकल्याचा प्रकाश पसरत जातो. ..

राधाक्का बडबडत रहाते.शेजारी बघत रहातात.नि बाबू दीनवाणा होऊन प्रभाकडेच बघत रहातो. दिंडीतून येणारी प्रकाशाची तिरीप तिच्या चेह-यावर स्थिरावते !

****

विजय खाडिलकर ,

१४0३, माझगांव टॉवर्स,

म्हातारपाखाडी , माझगांव, मुंबई..१0

दूरभाषः 0२२ - २३७७६८८९ ,

चलतध्वनिः ९८२१२२२0४२

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी ही एक सशक्त भाषा आहे. सशक्त म्हणजे – जे भाव मनात आहेत ते अत्यंत तरलपणे आणि अचूकपणे सांगण्याची क्षमता असणे. उदाहरणार्थ या भाषेत बोलणे या एकाच कृतीला बोलला, सांगितले, म्हणाला, सुनावले, ऐकवले, उच्चारले, स्पष्ट केले, बोलून टाकले, सुचवले, कुजबुजला, पुटपुटला, खडसावले, विनवले, असे असंख्य शब्द आहेत आणि या प्रत्येक शब्दाला एक स्वतःची अशी अर्थछटा आहे. आपण जेव्हा आपली भाषा वापरतो तेव्हा या छटा आपण व्यवस्थित बोलू व समजू शकतो. म्हणून मराठी साहित्याचा , वाचनाचा , पुस्तकांचा प्रचार आणि प्रसार भरपूर व्हायला हवा. म्हणजे आता आहे त्याच्या निदान दहा हजार पट. सध्याचा आपला साहित्य व्यवहार हा अगदीच छोट्या विहिरीपुरता मर्यादित झाला आहे. त्याला एखाद्या विशाल महासागराचं रूप द्यायचा आमचा प्रयत्न आहे. त्यासाठी आम्हाला तुमची मदत हवी.

ई साहित्यची पुस्तकं विनामूल्य आहेत. ती तुम्ही कोणालाही कितीही देऊ शकता. त्यात दानाचं पुण्य मिळेल आणि खिशाला फ़ारसा खार न लावता. कृपया आपल्या ओळखीच्या किंवा माहितीतल्या लोकांना, संस्थांना, शाळांना, वाचनालयांना, कार्यालयांना , सोसायट्या, गावं, नगरपालिका, ग्रामपंचायत, ज्येष्ठ नागरिक संघ, महिला मंडळं यांत ई साहित्यची पुस्तकं पसरवा. त्यांची माहिती पुरवा. आमचे प्रतिनिधी व्हा. (मात्र बिनपगारी फ़ुल अधिकारी).

साहित्य प्रसाराचा हा बांध फ़ुटु दे. वाचू दे लोकांना. मराठी भाषा वैभवशाली होऊ दे.

काहीही मदत लागली तर आम्ही आहोतच. आपल्या उपक्रमांचे फ़ोटो आम्हाला पाठवा.

धन्यवाद

टीम ई साहित्य

